cmyk



दैनिक राज्य लोकतंत्र

घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक-१६४ | शनिवार, दि.५ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

### ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच बैलजोडी व झोपडीला सुद्धा मिळणार विम्याचे कवच

# ऊसतोड कामगारांसाठी 'संत भगवानबाबा ऊसतोड कामगार अपघात विमा' योजना लागू

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय: स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या स्वप्नपूर्तीत माझा वाटा, याचा आनंद-धनंजय मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याअंतर्गत ऊसतोड कामगार व वाहतूकदार, मुकादम आदींसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार विमा योजना प्रस्तावित केली होती, त्या योजनेस आज संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.**

या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम तसेच सुमारे दीड ते दोन लाख बैलजोड्या त्याचबरोबर कामगारांच्या झोपड्या यांना सुद्धा विम्याचे कवच आज झालेल्या निर्णयानुसार लागू करण्यात येत असून या योजनेचा संपूर्ण खर्च स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण



महामंडळाच्या भांडवलातून खर्च करण्यात येईल. ऊसतोड कामगार, मुकादम, कारखाना यांपैकी कुणावरही या योजनेचा कसलाही आर्थिक भार राहणार नाही. राज्याच्या बीडसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात कमीत कमी ६ महिने स्थलांतर करून उसतोडणीला जातात. ऊन, वारा, पाऊस, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत दिवसरात्र अत्यंत मेहनत व जोखमीचे काम त्यांना करावे लागते. ऊसतोडणी व वाहतुकीदरम्यान अनेक अपघात, विजेचा शॉक, सर्पदंश, वाऱ्या-पावसाने नुकसान, रस्ते अपघात यांसारख्या शेकडो समस्यांना तोंड देताना ऊसतोड कामगारांचे अनेकदा जीव जातात, अनेकजण ◄◄ पान २ वर

## फटाक्यांच्या गोडाऊनवर छापे

**४ कोटींचा मुद्देमाल जप्त**

बीड-दिवाळी जवळ आल्याने बेकायदेशिररित्या काहीजण गोडाऊनमध्ये फटाक्यांचा साठा करत आहेत. याची माहिती मिळताच आरटीओ कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या फटाक्यांच्या ५ गोडाऊनवर छापे मारले. यावेळी ४ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ही कारवाई बीड ग्रामीण पोलिस ठाण्याचे प्रभारी बाळराजे दराडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुरुवारी रात्री केली. लिंबारुई शिवारातील व आरटीओ कार्यालयाच्या मागे असलेल्या गोडाऊनमध्ये फटाक्यांचा मोठा साठा ◄◄ पान २ वर

# चाळे करायला गेले हॉटेलात, पोहचले थेट पोलिस ठाण्यात

### सौम्य बळाचा वापर: २०० जणांविरोधात गुन्हा दाखल, पोलिसांच्या गाडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

चाळे करण्यासाठी दोन मुली आणि धाराशिव येथील दोन तरुण बीड येथील गोल्डन चॉईस हॉटेलमध्ये गेल्यावर काही तरुणांच्या हे निदर्शनास आल्याने पाहता पाहता परिसरातील नागरीकांनी हॉटेलला गराडा घातला. याची माहिती मिळताच शहर पोलिस तेथे दाखल झाले. त्या दोन जोडप्यांना ◄◄ पान २ वर



### पोक्सोअंतर्गत होणार गुन्हा दाखल

ज्या मुलाचे बीडच्या मुलीबरोबर लग्न जमले होते. त्या मुलाची प्रियसी ही अल्पवयीन आहे. तीला १८ वर्ष पुर्ण होण्यास १० ते १२ दिवस असल्याचे समजते. त्यामुळे त्या मुलाच्या विरोधात पोक्सोअंतर्गत वेगळा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे समजते.

### एकाच समुदायाच्या तरुण आणि तरुणी

हॉटेलमध्ये जोडपे सापडल्यावर त्यातील तरुण एका समुदायाचे आणि तरुणी दुसऱ्या समुदायाची असल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. त्यामुळे एक समुदाय आक्रमक झाला होता. त्यांनी हॉटेलसमोर बराच वेळ राडा केला. शेवटी दोन तरुण आणि दोन तरुणी या एकाच समुदायाची असल्याचे समजताच सर्वजण शांत झाले.

# बीडमध्ये रिपाइंचे निळे वादळ आज धडकणार-पप्पु कागदे

**बीड । प्रतिनिधी**

**रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने आज शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दुपारी ३:३० वाजता, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सपन्न होतो आहे. या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात निळे वादळ उसळणार आहे.**



मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्री म्हणून निवड झाली आहे.या निवडीचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे ◄◄ पान २ वर

# आज बीडमध्ये अनिलदादा जगताप यांच्या संकल्पनेतली होम मिनिस्टर स्पर्धा होणार साकार!

### फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह विजेत्या महिलांना मिळणार पैठणी साडी; सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु!



**बीड। पतिनिधी**

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने आज दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले ◄◄ पान २ वर

## माळ तिसरी



तृतीयेचे दिवशी अंबे
शृंगार मांडिला हो ।।
मळवट पातळ चोळी
कंठी हार मुक्ताफळां हो ।।
कंठींचीं पदकें कांसे
पीतांबर पिवळा हो ।।
अष्टभुजा मिरविती अंबे
सुंदर दिसे लीला हो ।। ३ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

# आ.आण्णांच्या प्रयत्नातून विकासासाठी कोट्यावधींचा निधी-शिवराज पवार

### आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नातून ५० कोटी रुपयांच्या रस्ता कांमाचे आज उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

**मतदारसंघातील रस्ते,जलसिंचन,आगनवाडी, दवाखाना,शाळेच्या इमारती अशा विविध विकास कामे करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा पवार यानी सरकार दरबारी पाठपुरावा करून मतदारसंघातील सर्वांगिण विकासासाठी कोट्यावधीचा निधी आणून मतदारसंघाचे चित्र बदलत आसल्याचे शिवराज बाळराजे पवार यानी गावातील विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना म्हटले.**



आज दि. ४ ऑक्टोबर रोजी मन्यारवाडी,धोंडराई, बेलगाव,भोजगाव, आदि गावच्या रस्ता कामांचा शुभारंभ युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते करण्यात आला. यावेळी सरपंच बाबासाहेब पवार, उपसरपंच हरीभाऊ निकम,सुदाम बप्पु डिंगरे, नारायण जगताप, संतोष सोनमाळी, केशव साळुंके, परमेश्वर पवार, संजय जाधव पंचायत समिती सदस्य, नंदू शेठ गरड ◄◄ पान २ वर




## बाजारभाव



कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,३०० | २,७०० | २,४१८ |
| ज्वारी/हायब्रिड:१८४.०० क्विंटल | २,००० | २,५३१ | २,२१९ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : २३.५० क्विंटल | ६,००० | ७,३७१ | ६,६५१ |
| बाजरी : ३२.०० क्विंटल | १,९०० | २,९५१ | २,४८४ |
| मुग : ११.०० क्विंटल | ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| सोयाबीन: ६८३.०० क्विंटल | ३,२१० | ४,३६० | ३,९५७ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# फडणवीसांचा निरोप घेऊन परमेश्वर येवले जरांगे पाटलांच्या भेटीला

### आंतरवली सराटीत झाली दोघांमध्ये चर्चा; सकारात्मक मार्ग निघणार का?

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरुन सध्या राज्यात सामाजिक तणावाचे वातावरण आहे. अनेकांनी राज्य सरकार आणि जरांगे पाटील यांच्यात मध्यस्थी करण्याचाही प्रयत्न केला. मात्र आतापर्यंत तोडगा निघाला नाही. देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक व उद्योजक परमेश्वर नाना येवले यांनी आंतरवली सराटीत जावून मनोज जरांगे पाटील यांची शुक्रवारी भेट घेतली आहे. फडणवीसांचा निरोप घेऊन येवले यांनी ही भेट घेतली असल्याची माहिती समोर येत असून दोघांमध्ये बराच वेळ चर्चा झाली आहे.**

राठा आरक्षण प्रश्नावर गेल्या एक वर्षापासून राज्य सरकारची झोप उडाली आहे. लोकसभेला त्याचा फटकाही महायुतीला बसला असून अनेक बैठका, मध्यस्थी झाली तरी िवर अजून तरी तोडगा निघाला नाही. सामाजिक र्कार्कर्ते आणि देवेंद्र फडणवीस यांचे समर्थक परमेश्वर नाना येवले यांनी शुक्रवारी आंतरवाली सराटी येथे



जावून मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. फडणवीसांचा निरोप घेऊन ही भेट घेतली असल्याची माहिती असून येवले आणि जरांगे पाटील यांच्यात बराच वेळ चर्चा झाली आहे. फडणवीसांचा निरोप जरांगे पाटील यांच्यापर्यंत पोहचवण्याचे का परमेश्वर नाना येवले यांनी केले आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांच्या भुमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




cmyk

अग्रलेख

# कोडग्या सरकार विरोधात विधानसभा उपाध्यक्ष

साधारणतः दोन ते अडीच वर्षापूर्वी भाजपाचे धुरंधरे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन पक्षांना फोडत राज्यात सत्तेवर आलो असल्याचे छातीठोक वक्तव्य केले. मात्र त्यांनीच फोडलेल्या अजित पवार यांच्या पक्षाचे महाराष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार तथा विद्यमान विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी आदीवासी समाजाच्या आरक्षण प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण नको या प्रमुख मागणीसाठी शुक्रवारी मंत्रालयात बसविण्यात आलेल्या जाळीवर उतरून आंदोलन केले. त्यांच्यासोबत त्यांच्याच पक्षातील सहकारी आसाराम लोमटे, काँग्रेसचे बंडखोर आमदार, आणि भाजपाचे आमदारही सहभाग झाले होते. विधानसभेचे उपाध्यक्ष असलेल्या नरहरी झिरवळ यांना आपल्याच सरकारविरोधात आंदोलन का करावे लागले हा खरा प्रश्न आहे. आंदोलनाची दखल तर सोडाच साधी भेटही न घेणारे हे सरकार झिरवळ आणि संबंध आदिवासींसाठी कोडगे पणानेच वागत आहेत. याच कोडगेपणा विरोधात विधानसभा उपाध्यक्षांना आंदोलनात उतरावे लागले आहे. जे अत्यंत दुर्दैवाचे आहे.

वास्तविक पाहता आदीवासी समाजासाठी असलेल्या आरक्षण प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण द्यावे या मागणीवरून राज्याचे भाजपाचे आमदार मागील अनेक वर्षे आंदोलन करत आहेत. त्या संदर्भात सातत्याने भाजपाच्या नेत्यांनीही धनगर समाजाला आरक्षणाचे आश्वासन दिले. मात्र कायदेशीरदृष्ट्या ते शक्य नाही. तरी धनगर समाजाचे नेते आणि भाजपाच्या आमदारांकडून यासंदर्भातील मागणी सातत्याने लावून धरण्यात येत आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीवरून आधीच राजकिय वातावरण तप्त झालेले असताना यावेळी धनगर समाजाला आदीवासी समाजाच्या आरक्षणात हक्क पाहिजे. या प्रश्नावर आतापर्यंत सत्ताधारी पक्षांसह विरोधकांमधील आमदारांनी चुप्पी साधली होती. मात्र आता विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भाजपाच्या धनगर समाजाच्या आमदारांनी हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अखेर आदीवासी समाजातून सलग सहावेळा निवडूण आलेले आमदार तथा विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपली भूमिका मांडली. परंतु मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी चर्चेसाठी पुरेसा वेळ न दिल्याने अखेर नरहरी झिरवळ यांनी मंत्रालयात सुरक्षेच्या कारणास्तव बसविण्यात आलेल्या जाळीवर उडी मारत राज्य सरकारच्या विरोधात आंदोलन सुरु केले. विशेष म्हणजे नरहरी झिरवळ यांनी आंदोलन सुरु केल्यानंतरही राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक तशीच सुरु राहिली आणि त्यांचे आंदोलन थांबविण्यासाठी किंवा आदीवासी आरक्षणाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी राज्य सरकारमधील कोणीही या आदीवासी आमदारांसोबत चर्चा करण्यासाठी गेले नाहीत की साधा चर्चेचा निरोपही दिला नाही. वास्तविक पाहता विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना आणि अधिवेशन नसतानाच्या काळात विधानसभेचे अध्यक्ष तथा उपाध्यक्ष पदावरील व्यक्तीला राज्य सरकारला आदेश देऊ शकतात. तसेच या त्याबर कारवाई करण्यास सांगू शकतात. मात्र इथे राज्य सरकारच कोडगे बनल्याने विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. नरहरी झिरवळ यांच्यासोबत भाजपाचे हेमंत सावरा, काँग्रेसचे आमदार, आमराम लोमटे आणि अन्य एक आमदार यावेळी सोबत होते. जाळीवरून पोलिसांनी या आमदारांना बाहेर काढल्यानंतर या सर्व आदीवासी आमदारांनी दुसऱ्या माळ्यावरच ठिय्या आंदोलन सुरु केले.

आदीवासी आमदारांनी सुरु केलेल्या या आंदोलनामुळे राज्यातील भाजपाप्रणित सरकारला आपल्याच विधानसभा उपाध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तीच्या आंदोलनाची दखल घेण्याची गरज वाटू नये यावरून घटनात्मक पदाचा सन्मान आणि त्या व्यक्तीचा आदर किती आहे यावरून या सरकारची संवेदनशीलता दिसून येत असल्याची चर्चा या निमित्ताने मंत्रालयात सुरु झाली आहे.




बीड:शहरातील अंबिका चौक येथे जय मातादी नवरात्र उत्सव समितीच्या आई तुळजाभवानीची पहिल्या माळीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले,तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, युवा नेते अजय गायकवाड सह मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.तसेच बाभळवाडी गावातील तुळजाभवानी आईची पहिल्या माळीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक व युवा तरुण सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माझी 'अभिजात' मराठी...!

***मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा अधिकृतपणे प्राप्त झाला याचा सर्वच मराठी भाषकांना अभिमान आहे. याचा संदर्भ थेट बीड सोबत असल्याचा विशेष आनंद समस्त बीडवासियांना आहे. याच बीडच्या भूमीत आद्यकवी मुकुंदराज यांनी शके ११९० मध्ये पहिला मराठी ग्रंथ विवेकसिंधू लिहिला.***

मराठी भाषा ही मूळची आर्यांची भाषा मानली जाते. भाषेचा उगम उत्तरेकडे झाला असला तरी ही भाषा सातपुडा पर्वतरांगांपासून खाली कावेरी नदीच्या खोऱ्यापर्यंत विस्तारली व स्थिरावली. भाषा दर दहा कोसांवर बदलते आणि त्यानुसार मराठी संभाषणाच्या विविध शैली विकसित होत गेल्या. मराठी भाषा बोलणारे राज्य म्हणून १९६० साली भाषावार प्रांतरचनेत महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर आजपर्यंत याच सतत विकास आपण बघतो. त्यापूर्वी असणाऱ्या काळातील मराठी भाषेचा प्रवास देखील तितकाच महत्त्वाचा आहे. इसवी सन ५०० ते ७०० या काळात पूर्ववैदिक, वैदिक नंतर संस्कृत, पाली प्राकृत यात विविध उत्क्रांत होत मराठी भाषेचा उगम झालेला मानला जातो. 'श्री चामुन्डाराये करविले' असे शिलालेखावरील मराठी भाषेत लिखित पहिले वाक्य श्रावणबेळगोळ येथे असल्याचा दाखला उपलब्ध आहे. संत वाङ्मयातून मराठीचा लिखित प्रसार होत गेला. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांच्या रचनांमधून लिखित तसेच बोलीभाषेतील मराठी प्रगत आणि प्रगल्भ होत होती .मराठी भाषेबाबत संत ज्ञानेश्वर यांनी केलेले वर्णन सार्थ आहे. 'परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरेचि रसिके मेळविण'. भाषेत असणारे सौंदर्य आणि ते अधिक खुलविणारे अलंकार सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्याचाही स्विकार करणारी भाषा म्हणून मराठीला पाहिले जाते. सर्व भाषांमधील शब्दांना जोडत आल्याने मराठी अधिकच समृद्ध झालेली आहे. इतक्या वर्षांच्या प्रवासात विविध शासकांचा अंमल या प्रांतावर राहिला त्यामुळे मराठी भाषेत शब्दसंग्रह सातत्याने वाढत राहिला. अरबी, फारसी, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषेतील शब्द मराठीत कायमचे आले आणि आज ते मराठी भाषेचा भाग बनलेले आपणास



दिसतात. आज संगणक युगात मराठी इंटरनेटच्या प्रमुख भाषांपैकी एक आहे आणि मराठी भाषक आवर्जून मराठीचा वापर करतात, ही अतिशय अभिमानाची बाब आहे. साधारण २०१० च्या प्रारंभी फेसबुकच्या सारख्या माध्यमातून मी मराठी वापरायला सुरुवात केली. त्यावेळी इंग्रजी शब्दावलीत मराठी संदेश लिहिणारे अधिक होते व मराठीचा असा मराठीचा वर्ग मी सुरू केल्यावर अनेक जण मराठी कडे आकर्षित झाले. संगणक क्रांतीत 'युनिकोड' आल्याने या आभासी जगात मराठीचा झपाट्याने विस्तार झाला. मी स्वतः या माध्यमाला दिलेले शब्द आज दरमहा कोट्यावधी वेळा वापरल्याचे संदेश येतात. त्यावेळी मराठी भाषक म्हणून यांचा मलाही अभिमान वाटतो. मराठी भाषेचा प्रवास केवळ पुस्तकातूनच नव्हे तर प्रत्यक्षात अनुभवण्याची संधी मला शासकीय नोकरीच्या निमित्ताने मिळाली. २२ जिल्ह्यांमधून फिरताना त्या त्या ठिकाणचा मराठीचा लहेजा आणि गोडवा जाणवतो. रत्नागिरी ते गडचिरोली असा कार्यक्षेत्राचा प्रवास राहिल्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात जशी भाषा वेगवेगळी बोलली जाते तशीच ती वऱ्हाडात, झाडीपट्टीत, पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात, खानदेशात आणि पुण्या - मुंबईतही वेगळी राहते. महानगरीय प्रभाव असणारी मुंबईची मराठी खूपच वेगळी आहे. विद्येचं माहेरघर पुण्याची मराठी तितकीच सरळ आहे. आत्मियता जपणारी आणि विशिष्ट शब्दांना खेळवणारी वर्धा - नागपूरची मराठी वेगळी आहे. सिमावर्ती जिल्ह्यांमध्ये सिमेलगत असणाऱ्या नजिकच्या राज्यातील भाषेच्या प्रभावाखाली असणारी मराठी आणखीनच वेगळी वाटते. कोकणात मालवणी आणि तळकोकणची मराठी आणि गडचिरोलीतील मराठी एकदम भिन्न आहेत. जिल्हा बदल झाल्यास जाणवतं की पदार्थ, वस्तू आणि भांड्यांची नावे एकाच भाषेतली असली तरी ती जुळत नाही. पुण्यात अमृततुल्य अर्थात चहा करतात तर मुंबईत चहा बनवतात. विदर्भात मात्र चहा मांडतात ही भाषिक गंमतच आहे. साधारणपणे रस्त्यावर डावीकडे किंवा उजवीकडे वळतात मात्र खानदेशात डावीकडे फाकाचं असतं. मराठवाडी माणसं अंगावर कपडे अंगावर घालतात मात्र वैदर्भिय मराठीत कपडे लावतात..खूप वाटत असला तरी तोच मराठीचा वेगळेपणा आहे. अगदी भाषा तीच फरक.. काई त नी. ( वर्धेची भाषा) अर्थात....काही तर नाही....!

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी,बीड
मो.९८२३१९९४६६

## आय.टी.आय. च्या माध्यमातून टेक्निकल शिक्षण देऊन युवकांच्या हाताला काम देण्यासाठी प्रयत्न करणार-माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

**दिवसेंदिवस दिवस पदवी - पदव्युत्तर शिक्षण घेऊन बेकारी वाढतच आहे. आय. टी. आय. संस्था सुरू करुन बेरोजगारीवर मात करण्यासाठी जून महिन्यापासून मतदारसंघात ५ ठिकाणी आय. टी.आय. सुरू करणार असल्याचे माजी आ. भीमराव धोंडे गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी झालेल्या सभेत सांगितले.**

पुढच्या महिन्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने माजी आ. भीमराव धोंडे यांनी गेल्या दोन महिन्यापासून सुरू केलेल्या जनसंपर्क अभियानांतर्गत गावभेट दौऱ्याच्या निमित्ताने लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दौरा सुरू आहे. ४ ऑक्टोबर रोजी आष्टी तालुक्यातील बावी, सुरुडी, नागतळा, खडकवाडी,पांगरा, महिंदा, मोराळा, मेरडवाडी, माळेवाडी, वनवेवाडी पाटसरा, हातोला, कापशी या गावांचा दौरा केला. ठिकठिकाणी तोफा व फटाके वाजवून माजी आमदार भीमराव धोंडे यांचे ग्रामस्थांनी स्वागत केले. नागतळा येथील ग्रामस्थांनी बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढून स्वागत केले. पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले आपल्या संस्थेत सध्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमासाठी गोरगरिबांची ४० हजारांवर विद्यार्थी शिकत आहेत. बारावी व नंतर पदवीचे शिक्षण घेऊन सध्या नोकऱ्या कमी आहेत, त्यामुळे भविष्यात टेक्निकल शिक्षण महत्त्वाचे आहे. दहावी पास नंतर इतर शिकण्यापेक्षा एक - दोन वर्षांचे आय. टी. आय. कोर्स पुर्ण केल्यास विविध कंपन्यामध्ये नोकरी मिळते त्यामुळे काही



प्रमाणात का होईना बेरोजगारीवर मात करता येईल. वेगवेगळ्या प्रकारचे शंभरावर कोर्सेस आहेत असेही मा. आ. भिमराव धोंडे यांनी सांगितले. हातोला येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्यास माजी आ. भीमराव धोंडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, साहेब हे उमेदवार निश्चित आहेत, त्यामुळे आपण सर्वांनी लोकसभेच्या निकालाचा वचपा काढण्यासाठी तयारी करा. साहेबांनी मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे. हक्काचा माणूस म्हणून साहेबांना विधानसभेत पाठवा. वेगवेगळ्या ठिकाणी भाऊसाहेब लटपटे,माजी पं. स. सदस्य बाबासाहेब गर्जे, कुंडलिक आस्वर,सरपंच अभय गर्जे, सरपंच बाळासाहेब गर्जे,सरपंच संजय मिसाळ, सरपंच डॉ. नवनाथ गर्जे, कुंडलिक लटपटे, सुर्यभान कावळे, माजी सरपंच नारायण गर्जे, नवनाथ मिसाळ, सरपंच महेश अंगारखे, रामदास सोनवणे, भगवान गर्जे, विठ्ठल रोमण, कचरु दराडे, राजाभाऊ दगडखैर व इतरांची भाषणे झाली. श्री. छगनराव तरटे,अभयराजे धोंडे,भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख, युवा नेते विकी शेकडे, कुंडलिक आस्वर, योगिराज गर्जे, आबासाहेब गोल्हार, निवृत्ती गर्जे, रामभाऊ सारुक, उपसरपंच एकनाथ गर्जे,साहेबराव गर्जे,सरपंच केशव गर्जे, गहिनीनाथ साबळे, बबनराव सोनवणे, माऊली गर्जे , राजेंद्र गोरे, मच्छिंद्र गर्जे, दादासाहेब गर्जे, बाबासाहेब गर्जे, भगवान गर्जे, पोपट दहिफळे, मुरलीधर दहिफळे, आजिनाथ दहिफळे, बापुराव आव्हाड, सुर्यकांत गर्जे, मुरलीधर शेंडे, राजु जाधव, विष्णू शेंडे,अमोल शेंडे, सरपंच रभाजी गर्जे, सुखदेव शेंडे, अंबादास गर्जे, बापुराव गर्जे, आजिनाथ गर्जे, बाबासाहेब फुलमाळी व इतर उपस्थित होते.

# बीडमध्ये 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' उपक्रमातून तरूणाईशी थेट संवाद

## अभिनव उपक्रम राबवून करिअर, व्हिजनबद्दल नवमतदारांशी चर्चा



### इतर महाविद्यालयांत कार्यक्रम घेणार

'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत डॉक्टर दाम्पत्याने तरूणाईशी थेट संवाद साधला. त्यांना सौ.के.एस.के. महाविद्यालयात मिळालेला प्रतिसाद पाहून बीडमधील इतर महाविद्यालयांत हा कार्यक्रम घेणार असल्याचा मानस डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी थेट तरूणाईशी संवाद साधला. हा कार्यक्रम शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शुक्रवारी (दि.४) पार पडला. यावेळी शेकडो युवा विद्यार्थी -विद्यार्थीनींची उपस्थिती होती.

देशाच्या ताकदीमध्ये युवा शक्तीचा मोठा वाटा आहे. यावेळी तरुणाईचे विचार समजून घेतले. त्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे प्रमुख उपस्थितीत होते. तरुण वर्गातील नवमतदारांसमोरील समस्या, त्यांची मते आणि प्रश्न या विषयावर 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' हा उपक्रम राबविला. डॉक्टर दाम्पत्याने हजारो युवकांशी मुक्तपणे संवाद साधला. यावेळी अनेकांनी आपल्या मनातील प्रश्न विचारले. यामध्ये बीड मतदारसंघातील प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करण्यासाठी वाचनालय उभारण्यात यावे, पालीच्या तळ्यासह अनेक निसर्गरम्य परिसरात सुरक्षा आणि सुविधा मिळाव्यात, ज्याप्रकारे मुलींसाठी हॉस्टेल आहेत, त्याच प्रकारे मुलांसाठी देखील हॉस्टेल असावे. खेळाडूंसाठी विविध ठिकाणी सोयी सुविधा मिळाव्यात. मुलींना पोलीस भरतीचा सराव करताना सुरक्षा पाहिजे. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी येण्यासाठी बसची व्यवस्था करावी, जेणेकरून त्यांना ये जा करण्यासाठी त्रास होणार नाही. यासह अनेक प्रश्न तरूणाईने मांडले. त्यांच्या प्रश्नांचे निराकरण देखील डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी तितक्याच आपुलकीने, गांभीर्याने केले. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेला प्रथम प्राधान्य राहिले आहे. येणार्या काळात उद्योग धंद्यासाठी देखील प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. युवा शक्तीने मतदान करताना आपल्या समस्या कोण सोडवू शकतो? आपल्या भागाचा विकास कोण करू शकतो? याकडे देखील गांभीर्याने विचार करून मतदान करण्याचा सल्ला दिला. डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मुलींना तब्येतीची काळजी घेण्यासाठी नियमित जीम व योगा करण्याचा सल्ला दिला. यावेळी डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात तरुण वर्गाशी संवाद साधला. त्यामुळे तरुण वर्गात उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

## पान १वरून...

### ऊसतोड कामगारांसाठी 'संत भगवानबाबा

कायमस्वरूपी अपंग होतात व त्यांच्या कुटुंबाचा आधार नाहीसा होतो. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना, वाहतूक कामगारांना तसेच त्यांच्या पशूंना स्वतंत्र अपघात विमा योजना असावी, त्याद्वारे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत व उपचार अशा निरनिराळ्या तरतुदी असाव्यात असे २०२२ मध्ये धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत प्रस्तावित केले होते. राज्याचे मुख्यमंत्री व सध्याचे सामाजिक न्याय मंत्री एकनाथराव शिंदे यांनी अर्थ व नियोजन विभागाच्या समन्वयातून या योजनेला मूर्त स्वरूप दिले असून, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ऊसतोड कामगारांना विम्याचे कवच असावे, हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आज महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण होत आहे आणि त्यात माझाही काही वाटा आहे, याचा मनाला मनापासून आनंद वाटतो आहे, याबाबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो, असे भावनिक उद्गार धनंजय मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहेत. पूर्वी केवळ कागदावर राहिलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय खात्याकडे हस्तांतरित करून घेत धनंजय मुंडे यांनी या महामंडळाला मूर्त स्वरूप दिले. महामंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ, लेखाशीर्ष निर्माण करून ऊसतोड कामगारांची प्रथमच शासकीय कागदावर 'ऊसतोड कामगार'म्हणून नोंदणी केली. या महामंडळाचा खर्च शासनावर अधिभार होऊ नये म्हणून राज्यात गाळल्या जाणाऱ्या उसावर प्रतिटन १० रुपये कल्याण निधी साखर कारखाना व त्याच्या समप्रमाणात निधी शासनाकडून अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली. याच महामंडळाच्या माध्यमातून राज्यात संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करून ऊसतोड कामगारांच्या मूला मुलींसाठी ८२ वसतिगृहे सुरू करून ऊसतोड कामगारांच्या हातात वडिलोपार्जित कोयता न देता पाटी-पुस्तक देऊन शिक्षणाचा मार्ग खुला केला आहे. त्यापाठोपाठ आता ऊसतोड कामगारांच्या विम्याचा प्रश्न निकाली निघाल्याने काही प्रमाणात का असेना परंतु कायम विकासापासून वंचित राहिलेल्या या वर्गाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे, असे म्हणता येईल.

---

### चाळे करायला गेले हॉटेलात,

पोलिसांनी ताब्यात घेत आपल्या गाडीत बसवले मात्र जमाव संतप्त झाल्याने त्या ठिकाणी सौम्‍ बळाचा वापर करावा लागला. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली असून या प्रकरणी जमावातील २०० जणांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरु होती. धाराशिव ेथील दोन तरुण हे त्यांच्या बीड येथील दोन प्रियसींना भेटण्यासाठी शुक्रवारी आले होते. विशेष म्हणजे या दोन जोडप्यातील एका जोडप्याचे लग्न सुध्दा जमले होते. लग्न जमलेले जोडपे आणि त्या तरुणाचा मित्र आणि बीड येथील मुलगी हे चाळे करण्यासाठी बार्शी रोडवरील अगोदरच प्रसिध्द असलेल्या हॉटेल गोल्डन चॉईसची निवड केली. हे दोन जोडपे तेथे जात असताना त्या दोन मुली या एका समुदायाच्या असल्याचे काहींच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ हे आजूबाजूच्या नागरीकांना सांगितले. त्यामुळे काही क्षणातच हॉटेलसमोर मोठा जमाव जमला. जमाव संतप्त होताच हॉटेल मालकाने हॉटेल बंद करुन शहर ठाणे पोलिसांना सदरील माहिती कळवली. पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ हे त्यांच्या सहकाऱ्यासह तेथे पोहचले. तेथे पोलिसांची गाडी आल्यावर हॉटेलमध्ये जावून त्या दोन जोडप्यांना ताब्यात घेऊन श्री बल्लाळ यांनी त्यांची विचारपुस केली. त्यावेळी हे सर्वजण एकाच समुदायाचे असल्याचे समजले असताना सुध्दा जमाव शांत होत नव्हता. त्यानंतर त्यांना पोलिसांच्या गाडीत बसवून शहर ठाण्याकडे घेऊन जात होते. मात्र ते दोन मुले एक समुदायाची आणि त्या दोन मुली दुसऱ्या समुदायाची असल्याची अफवा तेथे पसरली. त्यामुळे उपस्थित जमाव संतप्त झाला होता, तसेच पोलिसाची गाडी आडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला तसेच गाडी फोडण्याची भाषा केली जात असल्याने पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी सौम्‍ बळाचा वापर केल्याचे समजते. त्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करुन तेथून त्या दोन जोडप्यांना शहर ठाण्यात नेण्यात आले. या प्रकरणी गोंधळ घालणाऱ्या २०० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. यामध्ये शेख वाजेद शेख साजेद, रा.कुरेशी मोहल्ला, मोमीनपुरा, शेख अखील शेख नवाब, रा. चिंचोलीमाळी, दहीफळ, ता. ीड, शेख अखील शेख पाशा, रा. आरे-पाली नगर, बीड, सय्यद जावेद सय्यद बशीर, रा. नुरानी मश्जीद, तेलगाव नाका, बीड, शेख शोए शेख जियाउद्दीन, रा. इस्लामपुरा, पेठबीड, सय्यद मोहसीन सय्यद मोयनोद्दीन रा. इस्लामपुरा, पेठबीड, सय्यद मुजाहेद सय्यद एजाज रा. इस्लामपुरा, पेठबीड यांचा समावेश आहे.

---

### आज बीडमध्ये अनिलदादा जगताप यांच्या

असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

**बीडमधील महिला-भगिनीं जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- अनिलदादा जगताप**

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

### बीडमध्ये रिपाइंचे निळे वादळ

यांच्याकडून ऐतिहासिक सत्कार सोहळा आयोजित केला आहे. या सत्कार सोहळ्याची अतिशय जय्यत तयारी बीड शहरात करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने होल्डिंग, कमानी, बॅनर, निळ्या पट्टया व निळ्या ध्वजाचा झंझावात निर्माण करुन निळ्या वादळाचे शक्तिप्रदर्शन रिपाइंच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मंत्री रामदास आठवले यांचा हा सत्कार सोहळा ऐतिहासिक ठरणार असून त्यासाठी जिल्हाभरातून रिपाइं कार्यकर्ते हजारो गाड्यांचा ताफा घेऊन दाखल होणार आहेत. बीड शहरात रिपाइंच्या वतीने होणाऱ्या मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात हजारोच्या संख्येने सामील होऊन, निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन करावे.असे आवाहन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

---

### आ.आण्णांच्या प्रयत्नातून विकासासाठी

सरपंच, अशोक खिसाडे,दत्ता गवळी,बाबासाहेब डिंगरे, आसाराम डिंगरे, लक्ष्मण घाडगे,राम नाना डिंगरे, गिरजा आप्पा मराठे, ॲड.राजेंद्र साळुंके, रमेश पोटे,मदन डिंगरे, हरीभाऊ डिंगरे,पिंटू फरताडे, राजेंद्र फरताडे, कैलास कदम, भिमराव पवार, रघुनाथ सोनमाळी, भगवान सोनमाळी, शिवाजी जगताप राहुल बर्गे रखमाजी डिंगरे, विष्णू टिंगरे, बाबू टकले, वैजनाथ सोनमळी, सयाजी जगताप, जालिंदर यादव, लहू घाडगे, शिवाजी घाडगे, गणेश महाराज नावडे, लक्ष्मण घाडगे, जनार्दन शिंदे भीमराव घाडगे भानुदास चव्हाण बंडू घाडगे सुदाम घाडगे मदन घाडगे परभू मामा टकले रघुनाथ डिंगरे मदन नाना डिंगरे आसाराम पवार ज्ञानेश्वर खरवडे बाबुराव घाडगे भीमराव फरताडे भाऊसाहेब गायकवाड अविनाश पोटे, गणेश आखरे, नितेश निकम मदन निकम महेश घाडगे अभिमान घाडगे प्रकाश घाडगे महादेव पोटे बाबासाहेब जगताप विकास टकले रवींद्र जगताप परमेश्वर घाडगे विष्णू घाडगे गावातील नागरिक उपस्थित होते.

---

### फटाक्यांच्या गोडाऊनवर छापे

होता. हा साठा बेकायदेशिर असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली असून अवैधरित्या फटाक्यांचा साठा करणाऱ्यांचे आता धाबे दणाणले आहे.

---

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.०५ ऑक्टोबर २०२४


## मावीया जमील शेख यांची राज्यस्तरावर निवड



**अंबड । प्रतिनिधी**

शालेय क्रीडा राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी मत्स्योदरी विद्यालय अंबड येथील विद्यार्थिनी कुमारी मावीया जमीर शेख हिची निवड झाली आहे दिनांक २ ऑक्टोंबर रोजी झालेल्या विभागीय स्तरीय स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली असून दिनांक ५ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे अखिल भारतीय पातळीसाठी होणाऱ्या हॉलीबॉल स्पर्धे साठी महाराष्ट्र संघ निवड ला जाणार आहे याकरिता मत्स्योदरी विद्यालयातील उत्कृष्ट हॉलीबॉल पटू माविया जमील शेख या खेळाडूची निवड झाली.

# महिलांना प्रोत्साहनासह सन्मान देखील द्या

## आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पुण्यात रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्राच्या धागा प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन * आ. पंकजाताईंच्या भेटीने प्रदर्शनातील महिलांचा आनंद द्विगुणित

**पुणे । प्रतिनिधी**

''महिला कुटुंब सावरण्यात हातभार लावते. महिलेने केवळ घर सांभाळावे आणि पुरुषांनी बाहेर कमवावे, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. तिच्या अंगी कलाकुसर, सचोटी, प्रामाणिकता, जिद्द, नीटनेटकेपणा असतो. एखाद्या गोष्टीसाठी आपण महिलांना प्रोत्साहन देतो; शक्ती देतो. मात्र, त्यांना शक्तीसोबत सन्मानही मिळाला, तर त्या विविध क्षेत्रात यशाची शिखरे गाठतात,'' असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केले.

रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्रातर्फे आयोजित धागा या स्वदेशी मेळ्याचे उद्घाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले. प्रसंगी संयोजक व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, द शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष चारुदत्त देशपांडे, ब्रिहन्स नॅचरल प्रॉडक्टच्या संचालक शीतल आगाशे, एमएसएमईचे सहसंचालक मिलिंद बारापात्रे, उपसंचालक अभय दफ्तरदार, माजी नगरसेवक दिलीप वेडेपाटील, जयंत भावे आदी उपस्थित होते.





गोल्डन लीफ लॉन्स, म्हात्रे पुलाजवळ, डीपी रस्ता, कर्वेनगर, पुणे येथे हे प्रदर्शन येत्या रविवारपर्यंत (ता. ६) सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहील. वर्षा भिसे, केतकी तोरणे, रुपाली देसाई, गायत्री अकोलकर जोशी, पूजा किणीकर, अंजली रांजेकर, शिल्पा देशपांडे, योगिता जोग यांना यशस्वी उद्योजिका पुरस्काराने मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हँडलूम साड्या, ड्रेस मटेरियल, कुर्ती, ज्वेलरी, बॅग्स, कॉस्मेटिक्स, खाद्यपदार्थ असे वैविध्यपूर्ण स्टॉल्स या प्रदर्शनात आहेत.

### मंत्री असतांना बचतगट अधिक सक्षम केले

''जोवर महिला आर्थिक कणा बनणार नाही, तोवर तिला उचित सन्मान मिळणार नाही. त्यामुळे महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे. ग्रामविकास व महिला आणि बालकल्याण मंत्री म्हणून काम करताना महिलांसाठी अनेक चांगली कामे करता आली, याचे समाधान आहे. बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला सक्षम होत आहे. शहरातही असे प्रयोग सुरू आहेत. ग्रामीण भागात कर्जफेड करणाऱ्या महिलांना शून्य टक्के व्याजाने कर्ज दिले जाते, शहरी भागातही अशी सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करेन. लोकल टू ग्लोबल अधिक प्रभावीपणे अंमलात आणले पाहिजे. महिलेचा प्रतिभेचा सन्मान व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न व्हावेत असं पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या. कार्यक्रमाचे संचलन प्रिया निघोजकर यांनी केले. यावेळी आ. पंकजाताई मुंडे यांनी विविध वस्तूंच्या स्टॉलला भेट देऊन महिलांचं कौतुक केलं. त्यांच्या भेटीने महिलांचा उत्साह अधिक द्विगुणित झाल्याचे पहायला मिळाला.

## नागनाथ विद्यालयाचा रोहित जाधव जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम

**बीड । प्रतिनिधी**

युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रिडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत नागनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.



सैनिकी विद्यालय बीड येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेत नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या रोहित भारत जाधव याने ६० किलो वजन गटातून जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम आला असून त्याची विभागीय क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच साहिल हौसेराव जाधव मैदानी थाळीफेक क्रिडा स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातून तालुक्यातून प्रथम तर १९ वर्षे वयोगटातून २०० मिटर धावणेमध्ये सुमित संजय जाधव तालुक्यातून तृतीय आला. या सर्व यशस्वी खेळाडूंचे आशर्द शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.बी. माटे, पर्यवेक्षक बी.एस. वाणी, क्रिडा शिक्षक अमरसिंह काकडे, सर्व शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील क्रिडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## दिंद्रुड येथे नवरात्रौत्सवाला दणक्यात सुरुवात

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील नवरात्रौत्सवाला दणक्यात सुरुवात करण्यात आली. येथील जुने बसस्थानक परिसरात वटवृक्षाखाली जय भवानी व भुवनेश्वरी, येडाई मंदिरात मोठ्या दिमाखात देवीचा आगमन सोहळा पार पडला. येथील वटवृक्षाखाली स्थापना झालेल्या जय भवानी नवरात्रौत्सवाचे हे एकविसावे वर्षे आहे.

यंदा ०३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये हा शारदीय नवरात्री उत्सव साजरा केला जाणार आहे. काल बुधवारी दिंद्रुड ते तुळजापूर पायी चालत येथील युवा तरुणांनी आई तुळजाभवानीची ज्योत दिंद्रुड च्या भुवनेश्वरी मंदिरात गुरुवारी (दि.०३) सकाळी आठ वाजता वाजत-गाजत उत्साहपूर्ण वातावरणात आणली. सलग वीस वर्षांपासून जय भवानी नवरात्रौत्सवाची स्थापना करण्यात येते. या २१ व्या शारदीय नवरात्रौत्सवात येथील उद्योजक विकी कोमटवार यांच्या हस्ते जय भवानी देवीची पूजा व घटस्थापना करण्यात आली. नवरात्री उत्सव समितीचे अध्यक्ष विठ्ठल गवळी, उपाध्यक्ष काशिनाथ खांडेकर, सचिव अंगद पारेकर, कोषाध्यक्ष महादेव काटकर, सहकोषाध्यक्ष सुनील ठोंबरे आदींनी मोठ्या उत्साहात देवीची स्थापना केली. येथील भुवनेश्वरी मंदिर व जय भवानी नवरात्रौत्सवात आराध्यांचा मेळा व इतर सामाजिक, धार्मिक कार्यक्रम प्रसन्न वातावरणात साजरी केली जातात.



येथील जय भवानी नवरात्री उत्सवाचे एकविसावे वर्षे

# ऐन निवडणुकीच्या तोंडावर सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर; पिंपळवाडीत आरोग्य शिबिरात एक हजारांवर रूग्णांची तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

**ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय न होता, आम्ही दररोज चोवीस तास बीडकरांच्या सेवेत आहोत. निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करणारे कार्यक्रम घेण्याऐवजी आरोग्य सेवा देणे माझ्यासह डॉ.योगेश यांना योग्य वाटले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतरांप्रमाणे सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात जातो, त्यामुळे बीडची जनता आम्हालाच आशिर्वाद देईल, असा विश्वास कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.**

बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.४) पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प. तुकाराम महाराज भारती, माजी आमदार जनार्धन तुपे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, पिंपळवाडीच्या उपसरपंच पूजाताई बहिरवाळ, बेलखंडीचे सरपंच गुंडीबा देवडे, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, करचुंडीचे माजी सरपंच भालचंद्र भंडाणे, भाळवणीचे माजी सरपंच सचिन बहिरवाळ, शिवाजी येडे, मुळूकचे सरपंच रामकिसन कदम, वरवटीचे सरपंच बाळासाहेब इंगोले यांच्यासह पदाधिकार्यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, रूग्णसेवा हा राजकारणाचा भाग कधीच असू शकत नाही. माझ्यासह डॉ.योगेश हे वैद्यकीय क्षेत्र आणि राजकारणात सक्रीय आहेत. आमची आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सुरु असलेली आरोग्य सेवा राजकारणापलिकडे जाऊन सुरुच राहणार आहे. आम्ही निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करण्याऐवजी शाश्वत विकास कार्यक्रमांवर भर देत राहू. हाच प्रयत्न आगामी काळातही राहील, असे त्या म्हणाल्या. यावेळी श्रीरंग खटाणे, सीताराम बहिरवाळ, रवि काळे, बाळासाहेब थोरात, वैभव तुपे, तुकाराम वाघुले, भास्कर कदम, सुंदर कांगरे, राम जाधव, विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, बाबुराव वाघुले, अंकुश वाघुले, रामहरी वाळेकर, महेश वनवे, बापू येळवे, बाबा मस्के, बाळासाहेब जटाळ, महेश मातकर, शहादेव खोसे, अशोक वेदपाठक यांच्यासह रूग्ण, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली रुग्णांची तपासणी

पिंपळवाडीतील आरोग्य शिबिरास भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रुग्णांसह नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वतः काही रूग्णांची तपासणी केली. विधानसभा मतदारसंघातील पिंपळवाडीचे हे आठवे आरोग्य शिबिर असून अनेकांच्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आल्या आहेत.

## वन्यजीवाचे रक्षण करणे संतूलीत मानवी जीवनासाठी आवश्यक -वन परिमंडळ अधिकारी दिनेश मोरे

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

वन्यजीवाचे रक्षण करणे हे संतुलीत मानवी जीवनासाठी आवश्यक असून या वन्यजीवा विषयीची माहीती सर्वांना करून देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन धारूर येथे वन्यजीव सप्ताहाचे कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वनपरिमंडळ अधिकारी दिनेश मोरे यानी केले.

राज्यात वन विभागाचे वतीने १ आक्टोबर ते ७ आक्टोबर वन्यजीव सप्ताह साजरा केला. या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. धारूर वन कार्यालयाचे वतीने या निमित्त आयोजीत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तम चिकटे तर प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, पत्रकार सय्यद शाकेर, वडवणीचे वन परिमंडळ अधिकारी दिनेश मोरे, धारूरचे वन परिमंडळ अधिकारी पवार पवन, ईको बटालीयनचे नायब सुभेदार बी एच दिवेकर, सर्पमित्र चंद्रकांत घोगरे, यांचे उपस्थीत संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना सर्पमित्र चंद्रकांत खोगरे यांनी सर्पाचे प्रकार सांगून बिन विषारी सापाची संख्या जास्त आहे मात्र भिती नेच मृत्यु होतात असे सांगून सापाचे प्रकाराची माहीती दिली. यावेळी बोलताना वनपरिमंडळ अधिकारी दिनेश मोरे यांनी वन्य जीवांची माहिती सांगून पर्यावरण संतूलना साठी प्रत्येक वन्यजीव महत्वाचा असून त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीची आहे असे सांगत दुर्मील होणाऱ्या वन्य जीवाची माहिती सांगितली.



यावेळी पत्रकार अनिल महाजन पत्रकार सय्यद शाकेर यांनी या परिसरातील वन्यजीव यांचे विषयी माहिती सांगितली. यावेळी अध्यक्षीय समारोप वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तम चिटके यांनी केला. या वेळी सर्व वन कार्यालयाचे कर्मचारी व ईको बटालियनचे सैनिक उपस्थित होते.

## राजस्थानी विद्यालयात महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

राजस्थानी सेवा समाज संचलित कै. बि.दे. राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालय सहयोग नगर या शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, यांची जयंती अतिशय उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पारीख सर, सर्व कर्मचारी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून सौ. धारूरकर मॅडम ह्या होत्या त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी नेहमी खरे बोलावे आणि खरे वागावे असे आव्हान केले.तर प्रमुख पाहुणे तसेच वक्ते म्हणून श्री. डावकर सर हे होते. यावेळी प्रमुख वक्ते डावकर सर यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्याची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी समाजात जगण्यासाठी महात्मा गांधींचे विचार आपल्या जीवनात आणले पाहिजे व अहिंसा मार्गाने आपण जीवन जगले पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रमात ४० विद्यार्थ्यांनी भाषणे केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि.संभाजी माळोदे व चि. प्रतिक आर्सुळ इयत्ता सहावी या विद्यार्थ्यांनी छान प्रकारे केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु.सृष्टी खळगे हिने केले.या कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख श्री.सिकची सर, श्री.एकशिंगे सर, श्री.पंडित सर , सौ. राडीकर मॅडम ,सौ कुलकर्णी मॅडम, सौ.सारडा मॅडम,जोशी मॅडम,उमेश कोठी, रमेश शिंदे,गीता शिंदे यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

पान ६ वरुन...

### माजलगावमध्ये नामांकित

लहान मुले-मुली दररोज येतात.या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते. तिच्यावर शाळेतील एका अज्ञात इसमाने दि २७ सप्टेंबर रोजी मधल्या सुटीतील डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली.त्यामुळे तिच्यावर दवाखान्यात उपचार करण्यात आले.उपचारानंतरघरी आल्यावर चिमुकलीने शाळेत पांढरे कपडे घातलेल्या व्यक्तीने घाणेरडे कृत्य केल्याचे पालकांना सांगितली. शाळेतील पांढरे कपडे घातलेला त्या माणसाला मी ओळखते असेही सांगितले. चिमूरडीच्या माहितीने हादरलेल्या पालकांनी दि ०३ ऑक्टोबर गुरुवार रोजी थेट माजलगाव शहर पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को अंतर्गत गून्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस यंत्रणा उपविभागीय पोलिस अधिकारी धीरजकुमार बच्चू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ व त्यांचे सहकारी करत आहेत.

### गोरगरीबांचे आशिर्वाद आमची

जाधव, दिनेश पवार, गोविंदराव जाधव, पांडुरंग होमकर, सतिष राऊत, सुग्रीव रसाळ, सुरेश काशिद, कैलास सामसे, रमेश कागदे, पांडुरंग शिंदे, नवनाथ घोडके, सचिन घोडके, जलीलखान पठाण, अय्युब तांबोळी, सुलेमान पठाण, संजय सानप, सुधाकर जाधव, प्रभाकर सानप, लक्ष्मण ढास, कैलास येडे, श्रीरंग खटाणे, गौतम खटोड, विनेश कागदे, नितीन कागदे, भास्कर शेळके, राम शेळके, मधुकर पाटील, ओंकार कागदे, महादेव वक्ते, चिमाजी वाघमारे, बिभीषण घुगे, बापुराव शिंदे, सुभाष शिंदे, आबासाहेब मस्के, कुंडलिक धसे, श्रीराम मस्के, दिलीप डोंगर, शेख राजू, शरद ढाकणे, रवी निर्मळ, महारूद्र वाघ, दिनेश साठे, सतिष जोगदंड, बबनराव साठे, सय्यद आय्युब, मुरलीधर मोरे, विठ्ठल झोडगे, बाबुराव मिटकरी, चंदन मिटकरी, अनिल शिंदे, दत्तात्रय जोगदंड, जयदत्त कांबळे, नवनाथ तांदळे, आजिनाथ सोनवणे, सुधाकर मंचुके यांच्यासह डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पत्रकार, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, महिला-पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

स्व.काकूंच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प.समाधान महाराज यांच्या तोंडातून निघणारी वाणी आणि विनेचा स्वर राज्यात नव्हे तर देशात घूमतो असे मौलिक विचार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर बोलत असतांना त्यांचा कंठ दाटून आला आणि डोळे पाणावल्याचे दिसुन आले.

### जय भवानी नगर, पांढरी

तात्काळ चांगल्या दर्जाची रस्ते व नाले निर्माण करावे. या संदर्भामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने वडवणी नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे संबंधित सर्व प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडविण्या संदर्भात मागणी केली असून सविस्तर चर्चा केली आहे. सदरील निवेदनाची प्रशासनाने दखल न घेतल्यास नागरिकांना घेऊन आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देखील माकपच्या पदाधिकारी यांनी दिला आहे. यावेळी शिष्टमंडळात कॉ. लहू खारगे, कॉ. ज्योतीराम कलेढोन आदी उपस्थित होते.

### माहूरच्या देवीचे ठाण

आगळी वेगळी ओळख आहे. नवरात्रोत्सवामध्ये भाविकांना दर्शनासाठी उत्साहाचे वातावरण असून नवरात्रासाठी मंदिर समितीने जय्यत तयारी केली आहे.

नवसपूर्तीसाठी अनवाणी पायाची प्रथा

आजचे युग हे डिजीटल आणि संगणकीय आहे. तरी आजचे तरुण तरुणी मनूर देवीच्या दर्शनासाठी अनवाणी पायी वारी करतात तर नवसपूर्तीसाठी नवरात्रोत्सव काळात पायात चप्पल, बूट न घालता आणवाणी राहण्याचीही प्रथा आहे.

### जिल्हा वाहतूक शाखेने नियमबाह्य

आमलदार पोतदार आदींनी ही कारवाई केली. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली .या कारवाईबद्दल गेवराई शहरातील नागरिक पोलिसांना धन्यवाद देत आहेत.

### डिजिटल मीडिया

आणि कार्यकारणी सदस्य पदी जितेंद्र सिरसाट यांची नुकतीच निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा उद्या दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह गेवराई येथे गेवराई तालुका डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा पत्रकार संरक्षण कायद्याचे जनक एस एम देशमुख हे आवर्जून उपस्थित राहणार असून तालुक्यातील सर्व प्रेस व डिजिटल मीडियाच्या पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. याप्रसंगी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, गेवराई तालुकाध्यक्ष मधुकर तौर यांच्यासह मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास गेवराई, परळी , आंबाजोगाई, केज, बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर, वडवणी, धारूर, माजलगाव या तालुक्यातील सर्व मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पत्रकार बांधवांनी आवर्जून बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, डिजिटल मीडिया परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांच्यासह डिजिटल मीडियाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### अल्पसंख्यांक समाजाला मुख्य

देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले असून धारुर शहराच्या सुधारित पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटी रुपयांची तरतुद राज्य शासनाने केल्याचे यावेळी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ व्यापारी हाजी शेख अनिसोद्दीन तर प्रमुख पाहूणे म्हणून माजी नगराध्यक्ष लक्ष्मण सिरसट, गोपाळपुरचे सरपंच राजेश सोणवने, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे, एआयएमआयएम शहराध्यक्ष शेख मुबीन व मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तविक शेख फसियोद्दीन यांनी केले. सुत्रसंचालन सय्यद शाकेर यांनी तर आभार ॲड. परमेश्वर शिनगारे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने मुस्लिम युवक उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.५ ऑक्टोबर २०२४


# पैसे भरुनही शेतकऱ्यांना सोलर पंप मिळाले नाहीत

## स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक, परभणीत ठिय्या आंदोलन

शेतकऱ्यांना आपल्या शेतीला दिवसाही पाणी देता यावे, या उद्देशानं सरकारने सोलर पंप संदर्भातील विविध योजना आणल्या आहेत. मात्र, तीन-तीन महिने होऊन गेल्यानंतर शेतकऱ्यांना सोलार कंपन्यांकडून सोलर पंप दिले जात नाहीत. याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. परभणीतील अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं ठिय्या आंदोलन करण्यात आले.

हजारो शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये सहभाग घेत अर्ज केले आहेत. पैसे भरले, शेताचे सर्वे झाले असं असताना तीन-तीन महिन्यापासून या शेतकऱ्यांना सोलार पंप बसून देण्यात आलेले नाहीत. यामुळेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेने हे पंप तात्काळ देण्यात यावे, या मागणीसाठी परभणीतील अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. येत्या आठ दिवसांमध्ये सोलर पंप जर मिळाले नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना सिंचनासाठी केवळ १० टक्के रक्कम भरून कृषीपंपाचा लाभ दिला जातो



शेतकऱ्यांना सिंचनासाठी केवळ १० टक्के रक्कम भरून सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषिपंपांचा लाभ दिला जातो. सहा महिन्यांत राज्यातील शेतकऱ्यांकडून या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याला प्राधान्य दिले जात आहे. शेतकऱ्यांचा विद्युत पंपावर होणारा खर्च कमी करावा आणि सहजपणे दिवसा वीज मिळावी यासाठी मागेल त्याला सौरपंप योजनेतून दहा टक्के अनुदानावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषिपंपाचा लाभ दिला जातो. मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत सर्वसाधारण शेतकऱ्यांना दहा टक्के तर अनुसूचित जाती -जमातींच्या शेतकऱ्यांना पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. उर्वरित रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान म्हणून मिळते. दिवसा वीजपुरवठा आणि लोडशेडिंग किंवा बिलाची चिंता नाही, असे सौर कृषिपंपांचे वैशिष्ट्य असल्याने शेतकऱ्यांकडून या योजनेतून सौरपंपाची मागणीही केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांना सिंचन करण्यासाठी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' सुरू करण्यात आली आहे. यामुळे भारनियमनाची समस्या संपून, संपूर्ण आठ तास नियमित पाणी मिळण्यास मदत होईल. या योजनेसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करू शकतील. लाभार्थी निवडीचे निकष महावितरणने निश्चित केले आहेत. पाच एकरपर्यंत शेतजमीनधारक शेतकऱ्यांस ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचा सौर कृषीपंप, २.५१ ते ५ एकरपर्यंत शेतजमीनधारक शेतकऱ्यास ५ अश्वशक्ती क्षमतेचा आणि ५ एकरवरील शेतजमीनधारक शेतकऱ्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषी पंप दिला जाईल.

# आता हिरडा झाडांची सातबारा उताऱ्यावर होणार नोंद

पुणे : आंबेगाव तालुक्यातील तळेघर परिसरातील सुमारे ४०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपल्या खासगी क्षेत्रातील हिरडा झाडाची नोंद आपल्या सातबारा उताऱ्यावर करण्यासाठी लेखी अर्जाद्वारे मागणी केली होती. त्याची दखल घेत तहसीलदार संजय नागटिळक यांनी खासगी क्षेत्रातील हिरडा झाडांची नोंद संबंधित शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर करण्यात येईल, असे आश्वासित केले असून तशा सूचना आदिवासी भागातील तलाठ्यांना दिल्या आहेत, अशी माहिती किसान सभेचे पुणे जिल्हा सहसचिव अशोक पेकारी यांनी दिली.

किसान सभेच्या वतीने विविध मागण्यांच्या सोडवणुकीसाठी आंबेगाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचे निवेदन किसानसभेच्या वतीने देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेत उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय अधिकारी यांच्या मंचर येथील कार्यालयात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी तहसीलदार संजय नागटिळक, किसान सभेचे पुणे जिल्हा सहसचिव अशोक पेकारी, कृष्ण वडेकर, अशोक जोशी, रामदास लोहकरे, राजू लोहकरे, मच्छिन्द्र वाघमारे, अशोक असवले आदी उपस्थित होते. याबाबत पेकारी म्हणाले, हिरडा झाडाची नोंद आपल्या सातबारा उताऱ्यावर करण्यासाठी सुमारे ४०० पेक्षा अधिक हिरडा उत्पादक शेतकरी हे नुकतेच तळेघर येथे जमा झाले होते. त्यांनी आपले लेखी म्हणणे गावकामगार तलाठी विशाल गारे यांना सादर केले होते. या वेळी तलाठी यांनी तहसीलदार यांच्या सूचनेनुसार हे अर्ज स्वीकारून त्याची पोहच दिली होती. पुढील महिनाभरात सर्व हिरडा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिरडा झाडांची नोंद त्यांच्या सातबारा उताऱ्यावर केली जाईल, असे आश्वासन दिले. शेतकऱ्यांनी कोणत्या गटात किती हिरडा झाडे आहे याची जी माहिती दिली आहे. ती माहिती गावपातळीवर पीक पाहणी समितीच्या माध्यमातून तपासून ही नोंद केली जाईल.

# नाशिक-बीडमध्ये डाळींब, सीताफळ इस्टेट आणि वरोरा येथे भाजीपाला संशोधन केंद्र स्थापन होणार!

मुंबई : महाराष्ट्र कॅबिनेट बैठकीत कृषी संबंधित वेगवेगळे निर्णय घेण्यात आलेले आहे. यापैकी एक निर्णय म्हणजे नाशिक जिल्ह्यात डाळींब व बीड जिल्ह्यात सिताफळ इस्टेट स्थापन करणे तर दुसरा चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे भाजीपाला संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आलेला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

मालेगाव येथील तालुका फळरोपवाटीका निळगव्हाण येथे डाळींब इस्टेट स्थापन करण्यात येईल. यासाठी ३९ कोटी ४२ लाख ७५ हजार रुपयांची तरतूद केली जाईल. बीड जिल्ह्यात मौजे वडखेल (ता.परळी) येथे सिताफळ इस्टेट स्थापन करण्यात येईल. त्यासाठी ५३ कोटी ६० लाख २५ हजार रुपयांची तरतूद केली जाईल. या दोन्ही ठिकाणी आवश्यक असे मनुष्यबळ प्रतिनियुक्ती व बाह्य स्त्रोताव्दारे कंत्राटी पद्धतीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. चंदपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात एकार्जुना येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत भाजीपाला संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्रात भाजीपाला पिकांवर संशोधन करणे व भाजीपाला पिकांच्या देशी वाणांचे संवर्धन करुन भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान विकसित केले जाणार आहे. तसेच, भाजीपाला पिकांचे दर्जेदार उत्पादनासाठी शेडनेट हाऊस, आधुनिक रोपवाटिका तंत्रज्ञान, हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स तंत्रज्ञान, ठिबक सिंचन, फर्टिगेशन इत्यादी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.



# गाई-म्हशीचे चीक; फायदे व दुष्परिणाम

''चीक'' म्हणजे गाई-म्हशी विल्यानंतर पहिल्या तीन ते पाच दिवसात कासेतून येणारा पोषक समृध्द स्त्राव. चीक हा वासरांसाठी संजीवणी असतो कारण यातूल वासराना त्यांच्या आयुष्यासाठी प्रथम रोग प्रतिकार शक्ती मिळत असते. चीक हा फक्त वासरांसाठी नव्हे तर माणसासाठी सुध्दा फायदेशीर आहे पण त्याचा योग्य मात्रेत वापर न केल्यास त्याचे दुष्परीणाम होऊ शकतात.

चीका मधील पौष्टिक घटक : चीक हा नवजात वासरांसाठी सपूर्ण आहार असतो. त्यात अनेक प्रकारचे जैविक दृष्टया सक्रिय असे घटक असतात. तसेच चीका मध्ये पौष्टिक घटक हे सामान्य दुधाच्या तुलनेत जास्त प्रमाणात असतात. सामान्य दुधा पेक्षा प्रथिने चार ते पाच पटीने जास्त असतात. उर्जा दिड पटीने जास्त असते. खनिजे ही सामान्य दुधा पेक्षा जास्त असतात, त्यातल्यात्यात कॅल्शियम दुप्पट तर फॉस्फरस दिड पटीने जास्त असते. जिवनसत्व 'अ' १० पट, जिवनसत्व 'ई' ६ पट, तर जिवनसत्व 'डी' दुप्पट प्रमाणात असतात. या व्यतिरिक्त 'सी' आणि 'बी' जीवनसत्व ही चागल्या प्रमाणात असतात. रोग प्रतिकार शक्ती वाढवणारे घटक म्हणजेच ईम्युनोग्लोबूलिन (विशेषत: 'जि' आणि 'ए') शंभर पटीने जास्त असतात. तसेच दुधातील सामान्य घटक लॅक्टोज (साखर) योग्य प्रमाणात असते. विल्यानंतर दिवसेंदिवस जसेजसे चीक दुधात बदलायला सुरू होते तसतसे वरील दिलेल्या घटकाचे प्रमाण कमी कमी होत जाते आणि शेवटी गाई-म्हशीच्या शारीरिक गुणधर्मानुसार सामान्य दुधासारखे ते होउन जाते.

वासरांसाठी पहिला चीक अत्त्यंत महत्वाचा : वासरू जन्मल्यानंतर साधारणत: उभे राहून चीक पिण्याचा प्रयत्न करते. वासराला पहिला चीक जन्मल्यानंतर दोन तासाच्या आत पाजविणे अत्यंत गरजेचे असते. कारण या काळात चीकातील संरक्षक तत्वे लवकर आणि जास्तीत जास्त शोषली जातात. काही वासरे जन्मत: कमजोर असल्यामुळे



स्वत:हून चीक पिऊ शकत नाही तर त्यांना चीक हा काढून लहान मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या निप्पल-बॉटलचा वापर करून पाजवावा किंवा चीक पिण्यासाठी मदत करावी. सुरूवातीच्या तीन ते पाच दिवस चीक हा वासराच्या वजनाच्या दहा टक्के (१०%) इतकाच पाजवावा तसेच त्या चीकाचे विभाजन ३ ते ४ भागात करावे व वासरांना पाजवावे.

वासराला चीक पाजन्याचे फायदे : वासरू जन्मण्याच्या पूर्वी गाय-म्हैशीच्या गर्भाशयात असताना त्याच्या आईकडूनच पोषण तत्व घेत असते. जन्मल्यानंतर चीक हे सुरूवातीच्या काळात एकमेव पौष्टीक आहार आहे. जे नवजात वासराला जास्त प्रमाणात उर्जा व रोग प्रतिकार शक्ती देते. वासरांना होणाऱ्या न्युमोनिया, अतिसार किंवा हगवण इत्यादी घातक रोगाच्या विरूध्द रोग प्रतिकार शक्ती वाढवण्याकरिता चीक हा अत्यंत महत्वाचा आहे. पोटात पचनासाठी आवश्यक असलेल्या चांगल्या जिवाणूंची संख्या वाढवुन पचनक्रिया सक्रिय होते. चीक न पिलेल्या किंवा चीक कमी प्रमाणात पिलेल्या वासरापेक्षा योग्य प्रमाणात चीक पिलेल्या वासरात चांगली वाढ दिसून येते व वजन हे जलद वाढते.

अतिरिक्त असलेल्या चीकाचे संरक्षण : चांगल्या दुधाळ जातीच्या गाई - म्हशीत चीकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे वासराला चीक पुरेसा पाजवून काही प्रमाणात चीक शिल्ल्क राहतो. असे शिल्लक राहिलेले चीक वाया न करता त्याचे योग्य प्रकारे संरक्षण करता येतात.चीक हे कमी तापमानावर रेफ्रिजरेटर (फ्रिज) मध्ये साठवून ठेवता येतो व गरजेनूसार बाहेरकाढून अर्धा ते एक तास ठेवून पुन्हा वापराता येतो. अशाप्रकारे चीकाच्या पौष्टीक घटकात ही कमी प्रमाणातच बदल होतो आणि चीक पून्हा वापरायला चांगलाच असतो.

चीक पाजवण्या बदद्लचे गैरसमज : गाई-म्हशी विल्यानंतर चे पहिल्या चीकाचे सेवन वासरात किंवा माणसात हाणीकारकअसते. विलेल्या जनावरांचे झार / वार बाहेर पडल्यानंतरच वासराला चीक पाजावेअन्यथा दुष्परिणामकारक ठरते. चीक अतिरिक्त प्रमाणात असल्यामुळे दुसऱ्या गाई-म्हशीला जेवढे जास्त चीक पाजता येईल तेवढे जास्त पाजवावे. चीक पाजल्यामुळे वासराचे पोट खराब होतात आणि हगवण लागते.

विषबाधा : वरील नमुद केल्याप्रमाणे पशुपालकातील गैरसमजुतीमुळे विलेल्या जनावरांना किंवा अतिरिक्त चीकाचे प्रमाण असल्यामुळे, गाई-म्हशीला जास्त प्रमाणात चीक पाजल्यामुळे विषबाधा होते. साधारणत: गाई-म्हशीच्या पोटात प्रथिनांच्या पचनामुळे अमोनिया वायू तयार होत असतो. परंतू चिकाच्या अति सेवनामूळे व त्यातील जास्त प्रथिनांमूळे अमोनिया वायूची पोटात मोठया प्रमाणात वाढ होते.अमोनिया मेंदूच्या कार्यासाठी हानीकारक आहे म्हणून अशा जनावरांच्या मेंदूवर परिणाम होऊन झटके यायला सुरूवात होते आणि शेवटच्या टप्यात जास्त प्रमाणात झटके येऊन जनावर दगावण्याची शक्यताअसते.चिक हा लहान वासरांसाठी अमृत आहे. परंतु मोठया जनावरांसाठी ते विषआहे. म्हणून जास्तीचा चीक गायी-म्हशी, शेळया यांना पाजवू नये.

विषबाधेचे लक्षणे : चारा खाणे कमी होणे किंवा बंद होणे. अल्कली धर्मीयअपचण होऊन पोट गच्च होणे. रवंथ न करणे. अल्कली धर्मीय अपचण. पोटात दूखत असल्यामुळे पोटाला पाय मारून घेणे. शेण कमी प्रमाणात व पातळ टाकणे. झटके येणे इत्यादी. म्हणून गाई किंवा म्हशीना चीक पाजवू नये आणि पाजवल्यानंतर अशी लक्षणे दिसून आल्यास त्वरीत पशुवैद्यकाशी संपर्क साधावा. घरगुती उपचार म्हणून अशा जनावराना खायचा सोडा पाजू नये.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारतीय संस्कृत दिन
### शिक्षक दिन-भारत

### महत्वाच्या घटना

१९३२ : फ्रेन्च अपर व्होल्टा या प्रांताचे विभाजन करुन आयव्हरी कोस्ट, फ्रेन्च सुदान आणि नायगर असे देश निर्माण करण्यात आले.
१९४१ : इस्टोनिया हा प्रांत नाझी जर्मनीने ताब्यात घेतला.
१९६७ : ह. वि. पाटसकर पुणे विद्यापीठाचे सातवे कुलगुरू झाले.
१९७७ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने बाह्य सौरमालेचा अभ्यास करण्यासाठी व्हॉएजर १ या उपग्रहाचे पृथ्वीवरून उड्डाण केले
१९८४ : एसटीएस -४१-डी ही नासाच्या स्पेस शटल प्रोग्रामची १२ वी फ्लाइट आणि स्पेस शटल डिस्कवरीचे पहिले मिशन होते. हे डिस्कव्हरी यान आपली पहिली अंतराळ यात्रा पूर्ण करून कॅलिफोर्नियामधील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथे दाखल झाले.
२००० : ज्येष्ठ दिग्दर्शक हृषीकेश मुकर्जी यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर
२००५ : इंडोनेशियातील सुमात्रा येथे मंडाला एअरलाइन्सचे 'फ्लाईट ०९१' हे उड्डाण दाट लोकवस्तीच्या भागात कोसळुन विमानातील१०४ आणि जमिनीवरील ३९ लोक ठार झाले.
२०१२ : स्पेनमध्ये टेलिव्हिजनवर बंदी घालण्यात आलेल्या थेट बुलफाईटिंगच्या प्रसारणावर सहा वर्षांची बंदी उठवण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११८७ : लुई (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ८ नोव्हेंबर १२२६)
१६३८ : लुई (चौदावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ सप्टेंबर १७१५)
१८७२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि तामिळनाडू राज्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेता व लोकमान्य टिळक यांचे शिष्य वी. ओ. चिदंबरम पिल्ले यांचा जन्मदिन.
१८८८ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: १७ एप्रिल १९७५)
१८९५ : अनंत काकबा प्रियोळकर भाषा व इतिहास संशोधक, लेखक, संपादक व समीक्षक. त्यांनी संपादित केलेल्या विविध ग्रंथात रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर' व मुक्तेश्वरकृत 'महाभारताचे आदिपर्व' हे उल्लेखनीय आहेत. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
१९०५ : प्रसिद्ध भारतीय उपन्यासकार, कथाकार व संपादक वाचस्पती पाठक यांचा जन्मदिन.
१९०७ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)
१९२० : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१३)
१९२८ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (मृत्यू: १९ सप्टेंबर २००४)
१९३३ : आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'रॅमन मॅग्सेसे पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आलेले भारतीय नौदलाचे माजी सेवानिवृत्त प्रमुख अधिकारी व लोकपाल लक्ष्मीनारायण रामदास यांचा जन्मदिन.
१९४० : रॅक्वेल वेल्श अमेरिकन अभिनेत्री
१९५४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेट खेळाडू रिचर्ड ऑस्टिन यांचा जन्म.
१९४६ : मूळ भारतीय वंशाचा ब्रिटीश गायक व संगीतकार फ्रेडी मर्क्युरी यांचा जन्म.
१९८६ : भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : लुडविग बोल्टझमन ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २० फेब्रुवारी १८४४)
१९१८ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म: २० जानेवारी १८७१)
१९७८ : रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार. 'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे त्यांचे कवितासंग्रह विशेष गाजले. मुंबई आकाशवाणीवरील 'वार्यावरची वरात' व 'मेघदूत' या श्राव्य नियतकालिकांचे ते निर्माते व लेखक होते. (जन्म: ? ? १९०८)
१९८६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय महान वैमानिक नीरजा भनोट यांचे निधन.
१९८६ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ञ व हिंदी साहित्यिक अंबिका प्रसाद दिव्य यांचे निधन.
१९९१ : शरद जोशी पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिका संवाद आणि पटकथा लेखक (जन्म: २१ मे १९३१)
१९९२ : अतूर संगतानी उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म:)
१९९५ : सलील चौधरी हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९२२ चिंगरीपोथा, २४ परगणा, पश्चिम बंगाल)
१९९६ : भारतीय बिशप बॅसिल सालदवदोर डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ मे १९२६)
१९९७ : मदर तेरेसा शांततेचा नोबल पारितोषिक आणि भारतातील सर्वोच्च नागरिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध समाजसेविका, व कॅथोलिक चर्चच्या धर्मगुरू (जन्म: २६ ऑगस्ट १९१०)
२००० : रॉय फ्रेड्रिक्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९४२)
२०१५ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर २०१५)

# अंबाजोगाई शहरातील महिलांसाठी दांडिया फेस्टिव्हल

## स्पर्धेच्या मुख्य बक्षीस वितरण सोहळ्यात अक्षया देवधर यांची प्रमुख उपस्थिती

## दांडियाप्रेमींनी या फेस्टिव्हल मध्ये सहभागी व्हावे- संकेत मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर हे सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जोपासनारे शहर म्हणून ओळखल्या जाते. असाच सामाजिक सलोखा व संस्कृती जोपासण्याचे काम शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक मंडळ मागील अनेक वर्षांपासून करत आहे. शहरात होणाऱ्या नवरात्र उत्सवाच्या दरम्यान अंबाजोगाई दांडिया (गरबा) महोत्सवाचे आयोजन प्रियदर्शनी क्रीडा मंडळ व रोटरॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेचा मुख्य बक्षीस वितरण सोहळा हा सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री तुझ्यात जिव रंगला फेम अक्षया देवधर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार असल्याचे मुख्य संयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी दिली आहे. शहरातील जास्तीत जास्त दांडिया (गरबा) प्रेमींनी ढोल ताशा स्पर्धेप्रमाणेच दांडिया महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन देखील संकेत राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

अंबाजोगाई शहरात प्रथमच सर्वात मोठ्या दांडिया (गरबा) फेस्टिव्हल-२०२४ चे आयोजन प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक व्यायाम मंडळ आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक ८,९,१० ऑक्टोबर २०२४ दरम्यान दररोज सायं ६ ते १० या वेळेत मोदी लर्निंग सेंटरच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, रिंग रोड अंबाजोगाई येथील भव्य प्रांगणात करण्यात आले आहे. या उत्सवात नवरात्र निमित्त देवीचा जागर करून अंबाजोगाई दांडिया फेस्टिवल मोठ्या जल्लोषात साजरा केला जाणार आहे. या अंबाजोगाई दांडिया (गरबा) फेस्टिवलचे वैशिष्ट्ये म्हणजे या उत्सवात मुली, महिला , (कपल) जोडी आणि १४ वर्षाखालील मुलांनाच प्रवेश दिला जाणार आहे. पुरुषांना महिला जोडीदार असल्याशिवाय पास किंवा प्रवेश मिळणार नाही. या दांडिया महोत्सवात सहभागी झालेल्या व विजेत्या स्पर्धकांना लाखोंची



बक्षिसे जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या स्पर्धेदरम्यान मुख्य बक्षिसांव्यतिरिक्त महिला स्पर्धकांस दररोज पैठणी, कपल स्पर्धकांस वॉच ( घड्याळ) त्याचबरोबर लहान मुलांना सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. बक्षीस जिंकण्याची संधी देखील मिळणार आहे. दि १० ऑक्टोबर गुरुवार रोजी या दांडिया महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांचा मुख्य बक्षीस वितरण सोहळा सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अक्षया देवधर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार आहे. मोदी लर्निंग सेंटर येथील नयनरम्य व सुरक्षित अशा खुल्या परिसरात हा गरबा उत्सव संपन्न होणार असून अंबाजोगाई शहरातून दांडिया खेळण्यासाठी व पुन्हा परत जाण्यासाठी मोफत बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या महोत्सवामध्ये सुप्रसिद्ध निवेदिका देखील सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर आकर्षक विद्युत रोषणाई, साऊंड आणि डेकोरेशन यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे. रंगीलो गुजरात या दांडिया थीमसह विविध सेल्फी पॉइंट्स देखील या ठिकाणी तयार करण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

स्पर्धेतील सर्व पासधारकांना मोफत दांडिया प्रशिक्षणाची सोय संयोजकांच्या वतीने केली गेली असल्याचे संयोजकांनी कळविले आहे. या महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी ४९९/- रुपये एवढे नाममात्र प्रवेशमूल्य ठेवण्यात आले असून या दांडिया महोत्सवात जास्तीत जास्त स्पर्धक व दांडियाप्रेमींनी सहभागी होण्याचे आवाहन प्रियदर्शनी क्रीडा मंडळ व रोटरॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई च्या वतीने करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी रिलायन्स पेट्रोल पंप अंबाजोगाई, चायवाय कॅफे खोलेश्वर कॉलेज रोड अंबाजोगाई , शुभम लखेरा ८६००६३४६००, सचिन जाधव ९९७५१७१९४४ ,जतीन कर्नावट ९१४६९९३३९४ , मयूर परदेशी ७७७४०१७७९५, सोमेश्वर पाटील ९०९६३७९६५१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# अंबाजोगाईत संवाद हृदयरोगाशी कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात गेल्या १९ वर्षापासून अविरतपणे रुग्ण सेवेत असणार्या घुगे हॉर्ट अॅन्ड क्रिटिकल केअर हॉस्पिटलने १९ वर्ष पूर्ण करुन २० व्या वर्षात पदार्पण केले आहे. या १९ वर्षाचा प्रवास हा अनेक अडचणीला व संघर्षाला तोंड देत पार करण्यात आला आहे. घुगे हॉस्पिटलच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आणि जागतिक हृदय दिनाच्या निमित्ताने रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने '' संवाद हृदयरोगाशी व सी.पी.आर प्रात्यक्षिक '' कार्यक्रम रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सायं. ५ वाजता आध्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. तसेच, हार्ट अॅटक, अचानक होणारे मृत्यू व त्यांची कारणे, उपाय व आपत्कालीन परिस्थिती मध्ये करावयाचे उपचार व सी.पी.आर. याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी लातूर येथील प्रसिद्ध असे कार्डिओलोजिस्ट व हृदयरोग तज्ञ डॉ.संजयकुमार शिवपुजे हे मार्गदर्शन करणार असून या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा घुगे हॉस्पिटलचे संचालक डॉ.नवनाथ घुगे यांनी केले आहे.

घुगे हार्ट अॅन्ड क्रिटिकल केअर हॉस्पिटलची सुरुवात २००५ साली अंबाजोगाईत करण्यात आली. ज्यावेळी शहरामध्ये हृदयरोग असेल किंवा इतर अत्यावश्यक रुग्ण सेवेच्या गरजा असतील त्याची कसलीही साधने व सोय उपलब्ध नसताना डॉ.नवनाथ घुगे यांनी हा जोखमीचा प्रयोग सुरु केला. १९ वर्षाची यशस्वी वाटचाल हीच त्यांच्या कामाची पावती आहे. १९ वर्षाच्या कालखंडात अनेक आव्हाने व संकटे यांना तोंड देवून डॉ.घुगे यांनी आता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व अतिदक्षता विभाग ( आय. सी. यू. ) सुरु केले आहे. अत्यावश्यक सेवेसह अतिगंभीर रुग्णांसाठी सर्व अत्याधुनिक सेवासुविधा देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिलेला आहे. या हॉस्पिटलचा १९ वा वर्धापनदिन आणि जागतिक हृदय दिनाच्या नमित्ताने एक सामाजिक व जनजागृतीचा उपक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार घुगे हॉस्पिटल, रोटरी क्लब अंबाजोगाई, आय एम ए अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने '' संवाद हृदयरोगाशी व सि.पी.आर. प्रात्यक्षिक '' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात डॉ.संजयकुमार शिवपुजे, यांचे हार्ट अॅटक, अचानक होणारे मृत्यू व त्यांची कारणे, उपाय व आपत्कालीन परिस्थिती मध्ये करावयाचे उपचार यावर विस्तृत आणि सखोल मार्गदर्शन करणार आहेत. तरी या प्रसंगी पी.डी.जी. रोटरी क्लब, रोगप्रतिबंध आणि उपचार विभागाचे सल्लागार हरिष मोटवाणी साहेब, यांची उपस्थित असणार आहे. सध्याची धावपळीची जीवनशैली, ताण तणाव, चुकीची आहार पद्धती, व्यसन, धुम्रपान यामुळे कमी वयात रक्तदाब, मधुमेह, अति कोलोस्टॉल या सर्व गोष्टीमुळे हार्ट अॅटक येण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. हार्ट अटॅक व संबधित आजारामुळे दर वर्षी जगामध्ये जवळपास दीड ते दोन करोड लोक मृत्यूमुखी पडतात. त्यातील ६५ % मृत्यू हे रुग्णालयात पोहचण्या आधीच होतात.म्हणून हृदय रोगाबद्दल व्यापक स्वरूपात जनजागृती करण्याच्या उद्देशाने व सामाजिक दायित्व जोपासत योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केल्यामुळे आपण एखाद्याचा जीव वाचवू शकतो किंवा त्यावर प्रतिबंध करू शकतो यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध महत्वाचा आहे म्हणून, अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा घुगे हॉस्पिटलचे संचालक डॉ.नवनाथ घुगे, रोटरीचे अध्यक्ष कल्याण, काळे, रोटरीचे सचिव धनराज सोळंकी व सर्व रोटरीचे पदाधिकारी, व आय. एम. ए. अंबाजोगाई चे सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# महेबूबिया आणि अंजुमन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने चार दिवसीय 'सीरत-उन-नबी' नात, प्रश्नमंजुषा, लेखन स्पर्धेला सुरूवात

परळी वै. । प्रतिनिधी

**महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई यांच्या मार्गदर्शनाखाली, महेबूबिया एज्युकेशन सोसायटी आणि अंजुमन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सीरत-उन-नबी चार दिवसीय 'सीरत-उन-नबी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ४ ऑक्टोबर २०२४ ते ७ ऑक्टोबर २०२४, ज्यामध्ये सर्व उर्दू माध्यम शाळांमधील विद्यार्थ्यांनी लेखन स्पर्धा, नात पठण, भाषण आणि क्विझ स्पर्धा यासह विविध स्पर्धात भाग घेतलेला आहे.**

आज सीरत-उन नबी उत्सवाचा पहिला दिवस होता, शुक्रवार ४ ऑक्टोबर २०२४ रोजी, इमदादुल उलूम शाळा आणि अंजुम उल उलूम मुलींच्या शाळेत ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षेत शिस्तबध्दता व उत्साहाने भाग घेतला. विद्यार्थ्यांना कार्बन कॉपीसह ओएमआर शीट आणि स्वतंत्र प्रश्नपत्रिका देण्यात आले होते. आज सुमारे ६१२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. परिक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्यात आली. परीक्षा समितीचे प्रभारी सय्यद अन्वर सर, परीक्षा सहप्रमुख खान बकश सर, सीरत कार्यक्रमाचे संयोजक मो. अतीक रज्जाक सर, सय्यद विरासत सर, अब्दुल गफ्फार सर आणि एआय एक्सपर्ट अबू तल्हा यांनी आपले कर्तव्य उत्कृष्टपणे पार पाडले. बऱ्याच विद्यार्थी आणि पालकांनी त्यांचे विचार सामायिक केले की त्यांनी पहिल्यांदाच ओएमआर शीटद्वारे सीरत अन नबीच्या परीक्षेला सामोरे गेलेले आहे, जे त्यांनी फक्त सरकारी परीक्षा किंवा नोकऱ्यांच्या भरतीमध्ये पाहिले आहे. हे खरोखरच सहभागींसाठी अनुभव वाढवणारे होते. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी इयत्ता १ ली ते ४ थी साठी नात स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा सकाळी १०:०० ते २:०० या वेळेत तर दुपारी ३:०० ते ७:०० या वेळेत इयत्ता ५वी ते ७वी च्या वर्गासाठी पहिली फेरीची प्रश्नमंजुषा स्पर्धा होणार आहे, दोन्ही कार्यक्रम लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात होणार आहेत. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० पर्यंत इयत्ता ८ वी ते १० पर्यंत प्रश्नमंजुषा स्पर्धा ( फक्त मुले) आणि दुपारी ३:०० ते रात्री ७:०० पर्यंत इयत्ता ८ वी ते १० पर्यंत प्रश्नमंजुषा स्पर्धा (फक्त मुलींची ) त्याच ठिकाणी घेण्यात येईल. बक्षीस वितरण समारंभ आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेची अंतिम फेरी ७ ऑक्टोबर रोजी दुपारी २:०० ते ५:०० या वेळेत होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही संस्थांचे सर्व मुख्याध्यापक सय्यद वाजेद सर, मुख्याध्यापिका सय्यद नाजनीन बाजी, सिद्दीकी नुसरत बाजी आणि नुजहत बाजी हे प्रयत्नशील आहेत. हया सीरत-उन नबी कार्यक्रमांच्या सर्व स्पर्धा मध्ये उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांनी सहभाग घेतलेला आहे. महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई आणि दोन्ही सोसायटीच्या सर्व सदस्यांनी सर्व उर्दू माध्यम शाळा आणि व्यवस्थापन समित्यांनी या सीरत-उन-नबी उत्सवात सहभागी होऊन या भव्य सीरत-उन नबी उत्सवाच्या कार्यक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले आहे.

# अंबाजोगाई येथे असीम सरोदे यांच्याशी संविधान संवाद!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकरी, कामगार, कष्टकरी दीन-दलित सर्वहारा वर्गाच्या न्यायासाठी जीवन वेचणारे झुंजार स्वातंत्र सेनानी, बीड जिल्ह्याचे माजी खासदार, अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे संस्थापक कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने अंबाजोगाई येथे ज्येष्ठ विधितज्ञ एड. असीम सरोदे यांच्याशी संविधान संवाद आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ पत्रकार, संविधान कीर्तनकार ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर त्यांच्याशी 'संविधानाची पायमल्ली होत आहे का?' याविषयावर संवाद साधणार आहेत.

कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे प्रतिष्ठानच्या वतीने ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता अद्यकवी मुकुंदराज सभागृहात या संविधान संवादाचे आयोजन केले आहे. बदलत्या राजकीय, सामाजिक परिस्थितीत संविधानाची गळचेपी होत असल्याची चर्चा आहे. या परिस्थितीत समाजमन भक्कम करण्यासाठी एड. असीम सरोदे सातात्याने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्याशी संवाद साधणारे ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर हे कीर्तन, व्याख्यान, प्रवचनातून संविधान जागृती करीत आहेत. भारतीय संविधानाला ७५ वर्षे होत असताना या दोन संविधान अभ्यासकांतील हा संवाद अंबाजोगाईकरासाठी एक पर्वणीच ठरणार आहे. तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे


# डॉ.अंजली घाडगे यांना मिळतोय उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी व वर्षानुवर्षे विकासापासून कोसो दूर असलेल्या या मतदारसंघाचा चौफेर विकास करण्याची दृष्टी ज्यांच्याकडे आहे. त्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांना अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. २ ऑक्टोबर रोजी डॉ.अंजलीताई यांनी अंबाजोगाई शहरातील अनेकांना भेटून थेट संवाद साधला.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या लोकप्रिय ठरत असलेल्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे या मागील अनेक वर्षांपासून समाजकारणात व राजकारणात कार्यरत आहेत. त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. नवी आव्हाने पेलून त्या आता विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झेप घेण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्यांनी निवडणूक लढविण्याची पूर्णतः तयारी केली आहे. केज हा मतदारसंघ मागील ३० वर्षांपासून राखीव आहे. तो ज्यांच्या ताब्यात आहे. त्यांनी अंबाजोगाई जिल्हा करतो, बुट्टेनाथ साठवण तलाव निर्माण करण्याचे, काळवटी साठवण तलावाची उंची वाढविणार, एमआयडीसी उभारणार यासारख्या विविध भूलथापा देवून प्रत्येकवेळी जनतेला भावनिक केले. व विविध निवडणुका जिंकल्या आहेत. परंतु, केज विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास ते करू शकले नाहीत. या मतदारसंघातील रखडलेली कामे, विकासाचा अनुशेष आणि सर्व जाती जमाती व समाजाला सोबत घेवून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची ज्यांची क्षमता आहे. त्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी मागील काही दिवसांपासून पायाला भिंगरी बांधून मतदार संघात समावेश असलेल्या केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील अनेक गावांना भेटी गाठी देत नागरिकांशी चर्चा करीत आहेत. ज्या दिवशी डॉ.अंजलीताई घाडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला त्याच दिवसापासून त्यांनी दौऱ्याला सुरूवात केलेली आहे. याची दखल पक्षाच्या वरिष्ठांनी घेतली आहे. पक्षाने त्यांच्यावर टाकलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी त्या समर्थपणे स्वतःच्या खांद्यावर पेलून नेत आहेत हे विशेष होय. दरम्यान बुधवार, दिनांक २ ऑक्टोबर रोजी नवरात्रीच्या घटस्थापनेच्या पूर्व संध्येला डॉ.अंजलीताई यांनी अंबाजोगाई शहरात विविध ठिकाणी गाठी भेटी दिल्या. यात भिमाई नगर व परिसर येथे भेट दिली. या भागातील मूलभूत नागरी समस्या आणि आरोग्याच्या या विषयी स्थानिकांशी चर्चा केली. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन स्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन ही दिले. तसेच अंबाजोगाई शहरातील पत्रकार अभिजीत लोमटे यांची मुले चि.श्रीजीत आणि चि.आदित्यराज यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले. अंबाजोगाई शहर आणि परिसरात डॉ.घाडगे यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. अंबाजोगाई येथील अंबारी शासकीय विश्रामगृह येथे स्थानिक कार्यकर्त्यांनी डॉ.अंजलीताई यांचे स्वागत केले. आणि आगामी विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



# मन्मन स्वामींच्या दर्शनासाठी मध्यप्रदेशचे कॅबिनेट मंत्री रविकिरण शाहू

बीड

बीड जवळील तिर्थक्षेत्र असलेले कपिलधार येथे मध्यप्रदेशचे कॅबिनेट मंत्री ना.रविकिरण शाहू यांनी भेट देवून श्री.संत मन्मथ स्वामींचे दर्शन घेवून धबधबा आणि कुंड परिसराची पाहणी केली यावेळी त्यांचा देवस्थान कमिटी श्री.भुरे यांनी तर्फे शाल, श्रीफळ व श्रीसंत मन्मन स्वामींची प्रतिमा देवून सत्कार केला.

भेटीदरम्यान मंत्री रविकिरण शाहू म्हणाले की, श्री.क्षेत्र कपिलधार येथे एकदम शांत व मन प्रसन्न करणारे वातावरण आहे. सध्या नर्मदा कलशयात्रा मी करत असून नर्मदा कलशयात्रा ही भारतासह ४ देशात सुरु आहे. एकुण ११ देशांत ही यात्रा पोहोंचणार आहे मंत्री रविकिरण यांनी ठरवलेले सर्व कार्य पुर्ण होईपर्यंत ते अनवाणी फिरणार आहेत.तसेच हिंदु धर्मात चांगले विचार आचरण करण्याची पद्धती आहे. सनातन हिंदु धर्मावर सतत संकटे येत असतात ते बंद झाले पाहिजे असेही ते म्हणाले यावेळी देवस्थान कमिटीचे श्री.भुरे, विश्वनाथ स्वामी पुजारी, श्री.शिवरुद्र विटेकर व इतर शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कष्टकरी वयोवृध्दांना बळ व आधार मिळावा

## सोमनाथ रोडे, जनसहयोग मध्ये जागतिक वृध्द दिन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील कष्टकरी वयोवृध्दांना आर्थिक बळ व स्वाभीमानाने जीवन जगण्यासाठी आधार मिळाला पाहिजे अशी अपेक्षा ज्येष्ठ विचारवंत सोमनाथ रोडे यांनी येथे व्यक्त केली. येथील मानवलोक। जनसहयोगतर्फे बुधवारी (दि.२) जागतिक वृध्द दिन साजरा झाला त्याप्रसंगी प्रा. सोमनाथ रोडे बोलत होते. मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया, डॉ. नरेंद्र काळे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव खोगरे, अण्णासाहेब रोहम, कल्पनाताई लोहिया, अरूण आसरडोहकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. रोडे म्हणाले, की हा गांधीजींचा देश आहे. त्यामुळे इथे कष्टकऱ्यांना व वयोवृध्दांना सन्मान मिळाला पाहिजे. डॉ. व्दारकादास लोहिया यांनी जनसहयोगच्या माध्यमातून वयोवृध्दांसाठी चांगला उपक्रम सुरू केला. त्या कार्यात अनिकेत लोहिया व श्याम सरवदे यांनी सातत्य ठेवल्याने गरिब निराधारांना चांगला आधार झाला आहे. या देशात काही जणांकडे कष्ट न करता मोठ, मोठी संपत्ती कशी काय



जमा होते असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कष्टकरी जनता ही या देशाची मालक आहे. त्यांना सन्मान मिळाला पाहिजे, गांधीजींच्या कल्पनेतील भारत बनवायचा असेल तर देशातील वृध्दांना आर्थिक पाठबळ मिळाले पाहिजे. ते न मिळाल्यास वृध्दांनीही संघर्षाची तयारी ठेवावी असे आवाहनही प्रा. रोडे यांनी केले.

या युगात दरमहा १५०० रुपये मानधनावर निराधार योजनेतील वयोवृध्दांचा उदरनिर्वाह भागत नाही. त्यांच्या औषधावरच मोठा खर्च होतो. त्यामुळे शासनाने या निराधारांना दरमहा कमीत कमी ५ हजार रुपये मानधन द्यावे अशी मागणी अनिकेत लोहिया यांनी केली.

शासनाने यासाठी योग्य पाऊल न उचलल्यास निराधार व वयोवृध्दांना रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल याची दक्षता शासनाने घ्यावी असेही अनिकेत लोहिया म्हणाले. यावेळी संजना आपेट व सावित्री सगरे यांनी स्वागत गीत सादर केले. श्याम सरवदे यांनी सूत्रसंचालन करून वृध्दांच्या कामात येणाऱ्या अडचणी मांडल्या, त्या कशा सोडविल्या याची माहितीही दिली. या कार्यक्रमास वृध्द निराधार महिलांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी दिलीप मारवाळ, बाळु फुलझळके यांच्यासह आदींनी पुढाकार घेतला.

# हिंगलाज माता देवीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

येथील समाजाचे आराध्य दैवत असलेल्या हिंगलाज माता देवीचा प्राणप्रतिष्ठा व घटस्थापना भावसार समाज सभागृह येथे करण्यात आली समाजाचे युवक सदस्य लक्ष्मीकांत भावसार यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली या वेळी मोठ्या संख्येने महिला मंडळ व समाज बांधव उपस्थित होते भावसार समाज बांधव हिंगलाज माता नवरात्र उत्सव विविध सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रम व स्पर्धा होणार असुन सहभागी होण्याचे आवाहन उत्सव समितीचे अध्यक्ष सतीश गरुड यांनी केले. या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी नवरात्र महोत्सव समितीचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी आयोजन करण्यात येते याही वर्षी मोठ्या प्रमाणात स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

# गोरगरीबांचे आशिर्वाद आमची कवच कुंडली -जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड-नगर-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाधीला आदरांजली वाहून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांनी स्व.काकूंनी लहान पणापासून स्वत:ला पुढे नेत दारिद्र्याचे चटके सहन करत त्यांनी पुढची पिढी समृध्द होण्यासाठी प्रयत्न केला. राजकीय, सामाजिक प्रवाहात अनेक टप्पे त्यांनी पाहिले असे प्रतिपादन केले तर स्व.काकूंनी आपले सर्व आयुष्य जनतेच्या सेवेत घालवले. जगाचे कल्याण संतांची विभुती, किर्तीरूपी उरावे, बीज पेरले तर उगवेल, फुलेल आणि बहरेल, केले कर्म भोगा त्याचे आले या जन्मात जे काही कराल तेच त्या जगात करण्याची संधी, जसे कर्म केले तसे फेडावे लागतात असे प्रतिपादन ह.भ.प.शर्मा महाराज यांनी केले.**





## जगाकडे न पाहता स्वत:च्या ध्येयाकडे बघत चला- ह.भ.प.शर्मा

शुक्रवार दि.४ रोजी स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाधीला आदरांजली वाहण्यासाठी जिल्ह्यातून मोठा चाहतावर्ग आला होता. या पुण्यतिथीनिमित्ताने ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन आयोजीत केले होते. यावेळी ह.भ.प.प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.उध्दव महाराज चोले, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज बरडकर, ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर, ह.भ.प.परशुराम महाराज मराडे, ह.भ.प.नाना महाराज ढेकणमोहाकर, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.अभिमान महाराज ढाकणे, ह.भ.प.योगेश महाराज जोगदंड, ह.भ.प.मकरंद महाराज जोशी, ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंदे, ह.भ.प.भागवत महाराज नरवडे, ह.भ.प.नरेश महाराज संगमेश्वर, ह.भ.प.सुग्रिव महाराज डाके, ह.भ.प.ओंकार महाराज कागदे, ॲड.कालिदास थिगळे, प्रा.जगदिश काळे, अरूण डाके, दिनकर कदम, विलास बडगे, हेमंत क्षीरसागर, माधवराव मोराळे, बाबूसेठ लोढा, विजुताई महिंद्रे, पुष्पाताई पांगारकर, लतीका भांडकर, विलास विधाते, मुखीद लाला, जयश्रीताई विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, गोर गरीबांचे आशिर्वाद आपले कवच कुंडले आहेत, हे संस्कार काकूंनी स्विकारून जिल्ह्याच्या मुख्य पदावर विराजमान होत जिल्ह्यात पहिली नगर-बीड-परळी या रेल्वे मार्गाचे उद्घाटन केले आणि खर्या अर्थाने या रेल्वे मार्गाचे त्या शिल्पकार आहेत. लहानपणी काकूंनी संघर्ष केला, संघर्षातून नानांचा संसार उभा करत राजकीय वाटचाल सुरू केली. काकूंचे बोट धरून आम्ही पुढे आलोत, काकूंनी आमच्यावर जे संस्कार केले ते संस्कार आणि त्याचा वारसा पुढे नेण्याचे काम करत आहोत. राजकीय, सामाजिक प्रवाहात अनेक चढउतार पाहिले, मात्र गोर गरीबांचा आशिर्वाद आमच्यासाठी कवचकुंडले ठरली. स्व.काकूंचे संस्कार पदोपदी उपयोगी ठरले. काकूंच्या पंखात गरूडझेप घेण्याची ताकद होती असे त्यांनी सांगितले. किर्तन सांगतांना ह.भ.प.समाधान महाराज शर्मा महाराज यांनी सांगितले की, शाम ची आई, राम ची आई आणि आपली आई या तिन्ही आईचे महत्व मनातून वाचा म्हणजे किर्तनाचा अर्थ कळेल. अंधाराला सोबत घेतल्याशिवाय काजव्याला पुढे जाता येत नाही. कौशल्या नावाच्या विद्यापिठातूनच रामाने मर्यादा शिकली. जे चांगले असते ते आदी लोकांनी घ्यावी लागते. म्हणून जुन्या काळी घरी बनवलेल्या वस्तू शेजारी देण्याची पध्दत होती. जग हे मोठं म्हणाल तर दुसर्या दिवशी खोटं म्हणत असेल. जगाकडे न पाहता स्वत:च्या ध्येयाकडे पहावे असे ते म्हणाले. यावेळी भरत लोळगे, सुधाकर मिसाळ, उषाताई सरवदे, शारदाताई डुलगज, गणपत डोईफोडे, अर्जुन बहिरवाळ, प्रा.दत्तात्रय आघाव, नानासाहेब काकडे, विष्णु जाधव, गणेश जवकर, सुरेश क्षीरसागर, उध्दव म्हेत्रे, पी.बी. भांडेकर, बिट्टी बहिर, एस.टी.नखाते, पांडुरंग तोंडे, आसाराम औसरमल, प्रा.आर.टी.गर्जे, रत्नाकर क्षीरसागर, नवनाथ कुलकर्णी, अशोक शेटे, शेख नसीरभाई, राजेंद्र पवार, प्रा.सत्येंद्र पाटील, राजेंद्र मुनोत, ॲड.दत्तात्रय डोईफोडे, राजेंद्र आगवान, विशाल क्षीरसागर, सखाराम मस्के, तुषार घुमरे, सुभाष क्षीरसागर, शेषेराव फावडे, अंकुश राठोड,ॲड. विष्णूपंत काळे, विजय सरवदे, वैभव क्षीरसागर, प्रविण सुरवसे, डॉ.मारूती आंधळे, ॲड.कालिदास थिगळे, डॉ.अरूण भस्मे, डॉ.राजा मचाले, चंद्रकांत पेंढारे, मूरलीधर राऊत, बंडू लांडे, शशिकांत माने, सतिष काटे, नसीर इनामदार, अन्सारी मैनोद्दीन, सादेक फारोकी, सतीष राठोड, सतपाल लाहोट, दिलीप आहेर, सर्जेराव खटाणे, अंबादास गुजर, अशोक वाघमारे, शेषनारायण कोळेकर, अर्जुन नलवडे, प्रा.सुदाम नवले, बबन वडमारे, प्रकाश उपरे, कोंडिराम निकम, धनंजय मोरे, भागवत खाकरे, गणेश राऊत, संपद गुंदेकर, गोपिचंद गुंदेकर, परमेश्वर घुमरे, विष्णूपंत पवार, बाबू घुमरे, प्रशांत पवार, उध्दव क्षीरसागर, पाशाभाई, शेख फय्यीम, जलील पठाण, खुर्शीद आलम, विश्वंभर सावंत, तानाजी कदम, निवृत्ती डोके, दादासाहेब मुंडे, कल्याण खांडे, राम भोगे, प्रकाश ईंगळे, लिंबाजीराव पान ३ वर



बीड : जिल्ह्याच्या माजी खासदार, लोकनेत्या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या स्मृतीदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील समाधीस्थळावर जाऊन अभिवादन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह गवगण शिक्षण संस्थेसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जय भवानी नगर, पांढरी वस्तीवरील नागरिकांना रस्ता नसल्याने हाल

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी नगरपंचायतमधील प्रभाग क्रमांक ११ विकासा पासून कोसो दूर आहे. नगरपंचायत झाल्यानंतर देखील या भागात अद्याप सर्व पायाभूत सुविधांचा अभाव आहे. जय भवानी नगर, पांढरी वस्ती हा भाग तर नगरपंचायत हद्दीच्या अगदी शेवटचा भाग आहे. वडवणी शहराची लोकवस्ती हळूहळू विस्तारत चालली असून अनेक नवीन लोकवस्त्यामध्ये रस्ते, नाल्या व इतर सोयी सुविधा झाल्या मात्र जय भवानी नगर व पांढरी वस्ती वरील नागरिकांचा वनवास आणखी संपला नाही. याकडे वारंवार प्रशासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत आहे.





## तात्काळ पक्के रस्ते व नाले करण्याची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची मागणी

पावसाळयामध्ये सतत पडत असलेल्या पावसामुळे या ठिकाणी कच्चे रस्ते आहेत तर अनेक भागांमध्ये नाल्या देखील नाहीत त्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर आणि रस्त्यावरील खड्ड्यात साचून या भागामध्ये पावसाळ्यात अत्यंत चिखलमय वातावरण असते. नागरिकांसह ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना चालताना तारेवरची कसरत करावी लागते. पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या अशा खराब रस्त्यामुळे घाणीचे साम्राज्य देखील वाढले असून याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

नागरिकांची होणारी गैरसोय व त्यांना होणारा त्रास व त्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता नगरपंचायत प्रशासनाने सदरील भागामध्ये तात्काळ पक्के रस्ते व नाल्या करून नागरिकांची होणारी हेळसांड थांबवावी. व प्रभागांमध्ये पान ३ वर

# डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांचा उद्या गेवराईत सत्कार

गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल उद्या दिनांक ६ ऑक्टोबर रोजी गेवराईत त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख उपस्थित राहून मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमास पत्रकारांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांनी केले आहे.



डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या प्रदेशाध्यक्षपदी बीड जिल्ह्याचे सुपुत्र अनिल वाघमारे यांची तर प्रदेश कार्याध्यक्षपदी संतोष शिंदे पान ३ वर

# जिल्हा वाहतूक शाखेने नियमबाह्य दुचाकी वाहनांवर कारवाई करून केला एक लाख तीन हजाराचा दंड वसूल

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई शहरामध्ये ठोठो आवाज करणारी वाहने तसेच काका ,नाना, मामा, दादा अशा नेमप्लेट असलेले १०७ वाहनावर कारवाई करून त्यांच्याकडून १ लाख ३ हजाराच्या दंड वसूल केला. ही कारवाई गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली.स.पो.नि. सुभाष सानप यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली गेल्या काही दिवसापासून शहर वाहतूक शाखेच्या वतीने फोटो आवाज करणारे सायलेन्सर लावलेले बुलेट फॅन्सी नंबर प्लेटवर कारवाई करण्यात येत आहे. शुक्रवारी गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत विशेष मोहीम राबवून यामध्ये फोटो आवाज करणारे बुलेट चे पाच सायलेन्सर काढण्यात आले. याबरोबरच काका, मामा ,दादा ,भाऊ अशा फॅन्सी नंबर प्लेट असलेले १०७ वाहनावर कारवाई करून या वाहनचालकाकडून १ लाख ३ हजाराचा दंड वसूल करण्यात आला. यामुळे जिल्हा वाहतूक शाखा बीडचे पी.एस.आय. कोठंबरे, पी. एस.आय. मिसाळ, हेड कॉन्स्टेबल, उबाळे ,नागरगोजे, शिंदे पोलीस हवालदार हारके ,गेवराई पोलीस ठाण्याचे ए.पी.आय.जंजाळ ,लंके पोलिस पान ३ वर



# अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटिबध्द -आ.प्रकाश सोळंके

## धारुर शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटींची तरतूद

किल्लेधारुर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा समाजातील सर्व घटकांसह अल्पसंख्यांक समाजालाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगत आजच मंत्रिमंडळ बैठकीत धारुर शहराच्या सुधारित पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटी रुपयांची तरतुद युती शासनाने केली असल्याचे प्रतिपादन केले.

येथील तहसील कार्यालयासमोर असलेल्या कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधण्याची अनेक वर्षांची मागणी होती. या तव्वकलशाह कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीसाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्या स्थानिक विकास निधितून २० लक्ष रुपये उपलब्ध करुन देत भिंत बांधकाम पुर्ण करण्यात आले. या भिंतीचा लोकार्पण कार्यक्रम आज दि.५ शुक्रवार रोजी घेण्यात आला. यावेळी आमदार सोळंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात लोकहिताचे काम करत असून अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात घेण्यासाठी पक्ष कटिबध्द असल्याचे सांगितले. येत्या विधानसभा निवडणूकीत मुस्लिम समाजाला दहा टक्के जागा पान ३ वर



# माजलगावमध्ये नामांकित शाळेच्या अंगणवाडीत चिमुकलीवर अत्याचार

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून माजलगाव येथील एका खासगी शाळेतील अंगणवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी एका अज्ञाताविरुद्ध माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

राज्यात बदलापूरच्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली असून त्यानंतर दररोज कोठे ना कोठे शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या, अन्यायाच्या घटना घडत असल्याच्या उघड होत आहेत. त्यामुळे पालक वर्गात अगोदरच भीतीचे वातावरण पसरलेले आहे.दरम्यान माजलगाव शहरालगत असलेल्या एका शाळेत अंगणवाडी आहे.त्यामध्ये परिसरातील पान ३ वर




## शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

# माहूरच्या देवीचे ठाण असलेली मनूरची रेणूकामाता भाविकांचे श्रद्धास्थान

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मनूर येथे माजलगावचे आराध्य दैवत असलेल्या रेणुकादेवीचे पुरातन मंदिर डोंगर माथ्यावर आहे.नवरात्रात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते तर नवरात्रोत्सवातील दहा दिवस भाविकांकरीता दर्शनाची रेलचेल असते,तर मंदिर परिसराची रंगरंगोटी करण्यात आली असुन घटस्थापना करण्यात आली आहे.

माजलगाव शहरापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या सिंदफणा नदीच्या तिरावरील डोंगरावर मनूर येथे माहूरच्या देवीचे ठाणे असलेल्या रेणूकामातेचे पुरातन असे मंदिर आहे. तालुक्यातील भाविकांचे श्रध्दास्थान व नवसाला पावणारी देवी म्हणुन या मंदिराची पान ३ वर



## नवसाला पावणारी देवी म्हणून ओळख

# संपादक गणेश मोकाशे यांची पत्रकार रवी उबाळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट

बीड । प्रतिनिधी

दैनिक राज्य लोकतंत्राचे निवासी संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे पुणे विभागाचे सचिव गणेश मोकाशी यांनी शुक्रवारी बीड येथील युवा पत्रकार तथा मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष तथा दैनिक नवराष्ट्रचे ब्युरोचीफ रवींद्र उबाळे यांच्या निवासस्थानी सांत्वन पर भेट दिली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक विशाल साळुंके त्यांच्या समवेत होते.

बीड येथील युवा पत्रकार तथा नवराष्ट्र चे ब्युरोचिफ, आकाशवाणीचे प्रतिनिधी रविंद्र उबाळे यांचे वडील सुरेशराव उबाळे यांचे गेल्या काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले होते .शुक्रवारी निवासी संपादक गणेश मोकाशे एका महत्त्वाच्या बैठकीसाठी बीड येथे आले होते. बैठकीनंतर त्यांनी पत्रकार रवी उबाळे यांच्या निवासस्थानी सांत्वन पर भेट दिली. यावेळी त्यांनी सर्व कुटुंबीयांची अस्थेवाईक पणे चौकशी करून कुटुंबीयांचे सांत्वन केले. याप्रसंगी रवी उबाळे यांचे ज्येष्ठ बंधू सुशील उबाळे, किरण उबाळे, चुलत बंधू अमोल उबाळे,तसेच उबाळे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार, दि.५ ऑक्टोबर २०२४ । पान ७

# हर्षवर्धन पाटलांसाठी शरद पवारांची इंदापुरात जंगी सभा

**पुणे । प्रतिनिधी**

भाजपमधील नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज भाजपला रामराम करत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली. इंदापूरमध्ये आपल्या कार्यकर्त्यांसमवेत बैठक घेऊन त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. या मेळाव्यापूर्वीच त्यांचा मुलगा आणि कन्या या दोघांनीही तुतारीचं स्टेटस ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रवेशाचे संकेत दिले होते. त्यानंतर, आजच्या मेळाव्यात त्यांनी कार्यकर्त्यांची भूमिका जाणून घेत आपली भूमिकाही स्पष्ट केली. मात्र, त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्ष प्रवेशाची तारीख ठरली नव्हती. आता, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी हर्षवर्धन पाटील यांचे पक्षात



स्वागत केलं आहे. तसेच, त्यांच्या पक्षप्रवेशाची तारीखही जाहीर केली. त्यामुळे, हर्षवर्धन पाटील यांच्या तुतारी हाती घेण्याच्या तारखेवरही आता शिक्कामोर्तब झालं आहे. मात्र, या निर्णयानंतर इंदापुरात पुन्हा बॅनर झळकू लागले आहेत. शरद पवार यांच्या भूमिकेवरच आता काहींनी प्रश्न उपस्थित केल्याचंही पाहायला मिळालं.

हर्षवर्धन पाटील यांनी कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला त्यावेळी कोणता निर्णय घ्यायचा याबाबत प्रश्न त्यांनी कार्यकर्त्यांना केले, त्यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांना तुतारी फुंकण्यासाठी समर्थन दिलं. यावेळी बोलताना हर्षवर्धन पाटील यांनी हा निर्णय घेण्याआधी आपण भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून त्यांच्याशी चर्चा केल्याची माहिती दिली आहे. तसेच, मी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतोय. माझा प्रवेश कधी होईल? हे माझ्या हातात नाही, असंही हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं होतं. आता, राष्ट्रवादी काँग्रेसकडून ह्या निर्णयावर शिक्कामोर्तब झालं आहे. ''राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षात येण्याचा निर्णय घेतला, त्यांचे मी मनापासून स्वागत करतो. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत इंदापूर येथे सोमवार ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता त्यांचा पक्षप्रवेश होईल,'' अशी माहिती प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोशल मिडिया अकाऊंटवरुन दिली.


### पक्षप्रवेशाविरुद्ध इंदापुरात झळकले बॅनर

पवार साहेबांनी इंदापूर तालुक्यात जो निर्णय घेतला, तो म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांची झालेले आहे, असा आशयाचा बॅनर झळकला आहे. इंदापुरातील दोघांनाही जनता कंटाळले होती. माझा राजा असा नव्हता अशा प्रकारचे सोशल मीडियावर बॅनर व्हायरल करून राष्ट्रवादीचा कार्यकर्त्यांकडून हर्षवर्धन पाटलांसमोर आव्हाने निर्माण करण्यात येत असल्याचेही पाहायला मिळत आहे. त्यामुळे, इंदापूरचं राजकारण सध्या राज्यभर चर्चेत आहे

# माजी क्रिकेटपटू सलिल अंकोला यांच्या आईचा खून? घटनेमुळे पुणे शहरात एकच खळबळ

पुणे - माजी भारतीय क्रिकेटपटू सलिल अंकोला यांच्या आई डेक्कन परिसरात प्रभात रस्त्यावरील घरात मृतावस्थेत आढळून आल्या. त्यांच्या गळ्यावर जखम झाल्याचे आढळून आले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, घराचा दरवाजा बंद करून त्यांनी स्वतःचा गळा चिरून घेतल्याची शक्यता आहे. परंतु त्यांचा खून झाला की आत्महत्या ही बाब अद्याप स्पष्ट झालेली नाही.

माला अशोक अंकोला (वय ७७, रा. प्रभात रस्ता, डेक्कन) असे त्यांचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या मातिहीनुसार, माला अंकोला प्रभात रस्त्यावरील एका सोसायटीमध्ये त्यांच्या मुलीसमवेत राहत होत्या. त्यांना सिझोफ्रेनिया नावाचा मानसिक आजार होता. त्यांच्या गळ्यावर समोरच्या बाजूला जखम आढळून आली आहे.



शुक्रवारी सकाळी दहा वाजल्यानंतर घरातील सदस्य बाहेर गेले होते. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घरात काम करणारी बाई आली. बेल वाजवूनही दरवाजा उघडत नसल्याने त्यांनी मुलीला फोन केला. मुलीने वडिलांना माहिती दिली. त्यांनी दरवाजा उघडला असता माला अंकोला रक्ताच्या थारोळात पडल्या होत्या. नातेवाइकांनी त्यांना शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पूना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याने डॉक्टरांकडून सांगण्यात आले.या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रवीण कुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी डेक्कन पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे. घराचा दरवाजा बंद करून त्यांनी स्वतःचा गळा चिरून घेतल्याची शक्यता आहे. परंतु त्यांचा खून झाला की आत्महत्या ही बाब समजू शकली नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होईल, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# तब्बल ५ हजार महिलांनी सामुहिकरित्या केले श्रीसूक्त, अथर्वशीर्ष पठण



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे 'नवरात्र उत्सव २०२४' दरम्यान तब्बल ५ हजार महिलांनी सामुहिकरित्या केलेल्या श्रीसूक्त आणि श्री गणपती अथर्वशीर्ष पठण, माता माता की जय चा नामघोष आणि शंख वादनाच्या निनादाने श्री महालक्ष्मी मंदिराचा परिसर दुमदुमून गेला आणि नवरात्र उत्सवातील द्वितीयेची पहाट मंगलमय झाली.

श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टच्यावतीने सामुहिक श्री सूक्त पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशा वादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर केशव शंखनाद पथक आणि श्रीमंत केसरी शंखनाद पथकातील वादकांचे शंखवादन झाले. कार्यक्रमास पारंपरिक वेशात उपस्थित महिलांनी जय माता दी च्या जयघोष करीत आसमंत दणाणून सोडला. श्रीसूक्त म्हणजे काय? त्याचे महत्व आणि महती याविषयी मीनल चौरसिया यांनी उपस्थितांना माहिती दिली. त्यानंतर अथर्वशीर्षाचा एक पाठ आणि श्री सूक्ताचे तीन पाठ असे सामुदायिकरित्या पठण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. यावेळी मुख्य आयकर आयुक्त रिना झा-त्रिपाठी, डॉ.सतिश देसाई, ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, भरत अग्रवाल, तृप्ती अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, निलेश लद्दड आदी उपस्थित होते.

# सुप्रिया सुळेंच्या हस्ते श्री महालक्ष्मी मंदिरात महाआरती



पुणे : पुणे शहरातील श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे आयोजित 'नवरात्र उत्सव २०२४' दरम्यान दुसऱ्या माळेला खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते श्री महासरस्वती, श्री महालक्ष्मी आणि श्री महाकाली यांची यांची महाआरती संपन्न झाली. या पावन प्रसंगी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. यावेळी बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या,

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग, पुणे इथे नवरात्रीदरम्यान आरतीसाठी मी दरवर्षी येते. श्री महासरस्वती, श्री महालक्ष्मी आणि श्री महाकाली एकाच ठिकाणी असणारे मंदिर कुठेच नाही; पण पुण्यात आहे. प्रत्येकाने या सुंदर मंदिरात जरूर यावे. मनाला आनंद, समाधान, शांती आणि एक नवी ऊर्जा मिळवण्यासाठी मी नेहमी या मंदिरात येते. इथे येऊन आदिशक्तीच्या आशीर्वादाने नव्या उत्साहासह पुन्हा कामाला लागते. असं ते यावेळी म्हणाल्या.

# खा.राहुल गांधी यांना २३ ऑक्टोबरला हजर राहण्याचे आदेश ; पुणे विशेष न्यायालयाने समन्स बजावले

**पुणे । प्रतिनिधी**

मानहानीच्या खटल्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना २३ ऑक्टोबरला हजर राहण्याचे आदेश पुणे न्यायालयाने दिले आहेत. विनायक दामोदर सावरकर यांची नात सात्यकी अशोक सावरकर यांनी हा मानहानीचा खटला दाखल केला आहे. राहुल गांधी यांनी गेल्या वर्षी इंग्लंडमध्ये दिलेल्या वक्तव्यावर सावरकरांच्या नातीने आक्षेप घेतला आहे.



परदेश दौऱ्यादरम्यान राहुल गांधी यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप आहे. याविरोधात सात्यकी कोर्टात पोहोचल्या. तेथून आता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेल्या तक्रारीत त्यांनी म्हटले आहे की, राहुल गांधींयांना माहीत असलेल्या कारणांमुळे अनेक वर्षांपासून सावरकरांची वारंवार बदनामी आणि अपमान करत आहेत. अशाच एका प्रसंगी ५ मार्च २०२३ रोजी जेव्हा राहुल गांधी युनायटेड किंगडममधील ओव्हरसीज काँग्रेसच्या मेळाव्याला संबोधित करत होते , त्यांनी हेतुपुरस्सर सावरकरांवर आरोप केले. हे आरोप खोटे आहेत. त्यांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवणे आणि 'सावरकर' आडनाव बदनाम करणे आणि त्यांच्या भावना दुखावण्याच्या विशिष्ट हेतू आहे.

२७ सप्टेंबर रोजी नाशिक जिल्ह्यातील न्यायालयाने सावरकरांवरील वक्तव्याप्रकरणी राहुल गांधी यांना नोटीसही बजावली होती. हे प्रकरण नोव्हेंबर २०२२ मध्ये दिलेल्या निवेदनाशी संबंधित आहे. सावरकरांच्या प्रतिमेला जाणीवपूर्वक हानी पोहोचवल्याचा दावा तक्रारकर्त्याने केला आहे.सावरकरांवरील काँग्रेस नेत्यांची वक्तव्ये चर्चेत आहेत. भाजपने राहुल गांधींवरही अनेकदा टीका केली आहे. अलीकडेच कर्नाटकचे मंत्री दिनेश गुंडू राव यांनी सावरकर मांसाहार करायचे, ते गोहत्येच्या विरोधात नव्हते, असा दावा केला. यावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे लोक सावरकरांचा वारंवार अपमान करत आहेत. कर्नाटकच्या मंत्र्याने दिलेल्या वक्तव्यावर शिवसेनेनेही आक्षेप घेतला होता. शिवसेनेचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनीही उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लावण्याचा अधिकार उद्धव ठाकरेंना नाही, असे ते म्हणाले. काँग्रेस मंत्र्याच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने पत्रकार परिषद घेणे अपेक्षित होते पण तसे झाले नाही, असे ते म्हणाले.

# २० हजार नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न मिटला; घोरपडीगावातील पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

पुणे । प्रतिनिधी

घोरपडी गाव आणि बीटी कवडे परिसरातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी समान पाणी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनिल कांबळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.



या टाकीमुळे सुमारे २ ते अडीच हजार घरांचा पाणी पुरवठा सुरळीत होणार आहे. सुमारे ४.५ दशलक्ष लीटरची क्षमता असलेली ही टाकी असून या टाकीमुळे या भागातील बालाजी नगर, श्रीनाथ नगर, गुलमोहर पार्क, बी टी कवडे नगर, निगडे नगर या ठिकाणी अनेकदा उद्भवणारा पाणी प्रश्न कायमच सुटणार आहे. माजी नगरसेविका मंगला मंत्री, लता धायरकर, हिमालीकांबळे, भाजपा शहर उपाध्यक्ष विवेक यादव, भाजपा पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा अध्यक्ष सुशांत निगडे, निलेश आल्हाट, दिलीप कवडे, संकेत कवडे, प्रकाश मंत्री, निलेश मंत्री, श्रीकांत मंत्री, नारायण सावा, माजी नगरसेवक दिलीप गिरमकर, किशोर धायरकर, आशिष सुर्वे, निलेश बिडकर उपस्थित होते.

# बिबट्याच्या हल्ल्यात दीड वर्षाची कालवड ठार


दौंड: 'पिलाणवाडी' येथे काल गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याच्या हल्ल्यात कालवड जागीच ठार झाली.ही घटना पिलानवाडी नजीक गोरोपाटा येथे काल मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

शरद सोपान शिंदे यांच्या जनावरांच्या गोठ्यात गायची कालवड बांधली होती . मात्र मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने अचानक हल्ला करत कालवडीला उसाच्या शेतात नेऊन फस्त केले. बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे येथील नागरिक भयभीत झाली असून वन विभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे. अशी मागणी शरद शिंदे ,माणिक शिंदे यांच्यासह पिलानवाडी ग्रामस्थांनी केली आहे .दरम्यान घटनास्थळी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी येऊन पंचनामे केली असून शवविच्छेदनाचा अहवाल वरिष्ठ कार्यालयात पाठवलेला आहे .सदर कालवडीचे आम्हाला नुकसान भरपाई मिळण्याची मागणी येथील शेतकरी शरद शिंदे यांनी केली आहे.

# आयटी इंजिनिअरच्या कारवर दुचाकीस्वारांच्या जमावाचा हल्ला, व्हिडीओ व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांमध्ये पुण्यात अनेक गुन्हेगारीच्या घटना समोर येत आहेत, खून, हत्या, महिलांवरील अत्याचार या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असतानाच आता आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रात्रीच्या वेळी आपल्या कुटूंबासोबत चार चाकी वाहनाने प्रवास करणाऱ्या एका आयटी अभियंत्याच्या कारवर दुचाकीस्वारांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अभियंता आणि त्यांच्या पत्नीला २९ सप्टेंबरच्या पहाटे एक भयानक अनुभव आला, जेव्हा काही मोटरसायकलवरून आलेल्या पुरुषांनी त्यांच्या कारचा पाठलाग केला आणि कारवर लोंखडी रॉडने हल्ला करत कारचे नुकसान केले. नांदे गावाजवळ त्यांना रोखण्याचा प्रयत्न



केला. सुस येथील त्यांच्या घरी पोहोचेपर्यंत दोघांचा पाठलाग करण्यात आला. आयटी अभियंत्याने नंतर पौड पोलीसांशी संपर्क साधला आणि तक्रार दाखल केली. या घटनेचा थरारक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे.(झींपश ऊीळाश)

आयटी अभियंता असलेले रवी करनानी यांनी आपल्या सोशल मिडिया एक्स अकाउंटवरती या हल्ल्याचा थरारक व्हिडिओ शेअर केला आहे. करनानी हे सूसगाव येथील रहिवासी आहेत. करनानी आपल्या पत्नीसोबत प्रवास करत असताना त्यांच्यावर दुचाकीस्वारांनी हातात लोखंडी रॉड घेऊन हल्ला केला. कारचे हल्ल्यात मोठे नुकसान झाले आहे, हल्ला करणारा जमाव दिसत आहे. या जमावाने करनानी यांना त्यांची कार थांबवण्यासाठी पाठलाग केला. करनानी हे आपल्या कुटुंबासह कारमधून प्रवास करत असताना त्यांच्यासोबत ही घटना घडली.

# डी.जे.चा बॉक्स पडून एकाचा मृत्यू

**दौंड । प्रतिनिधी**

पोळा सणानिमित्त काढलेल्या मिरवणुकीत चिंचेच्या झाडाची फांदी डी.जे. साउंड सिस्टीम गाडीवरील साउंड बॉक्सला धडकून सिस्टीमवरील साउंड बॉक्स गाडीसोबत चालत असलेला सहकारी प्रवीण ऊर्फ रवींद्र चंद्रकांत रणदीर (रा. वरवंड, ता. दौंड) याच्या डोक्यावर पडून त्याचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि. २) रात्री १० च्या सुमारास घडली. याबाबत पोलिस हवालदार जब्बार हारुण सय्यद यांनी फिर्याद दाखल केली.

सोनोरी (ता. पुरंदर) येथे पोळा सणानिमित्त बैलजोडीचे मालक सौरभ पंढरीनाथ काळे व बाळासाहेब नाना काळे (रा. सोनोरी, ता. पुरंदर) यांनी डी.जे. साउंड सिस्टीमसह मिरवणूक काढली होती. गावातील सावकार वस्तीजवळील चिंचेच्या झाडाजवळ बैलपोळ्याची मिरवणूक आली असता चिंचेच्या झाडाची फांदी डी.जे. साउंड सिस्टीम गाडीवरील साउंड बॉक्सला धडकून साउंड बॉक्स गाडीसोबत चालत असलेला सहकारी प्रवीण रणदीर याच्या डोक्यावर पडून तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने सासवडच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बैलमालक सौरभ पंढरीनाथ काळे व बाळासाहेब नाना काळे तसेच डी.जे. सिस्टीमचे मालक अभिजित बुवा दिवेकर व लखन युवराज घोडके (रा. वरवंड, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# सरकारला फक्त मृतदेहच बघायचे आहेत का ? खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला धारेवर धरले

पुणे: मंत्रालयासारख्या पवित्र ठिकाणी संविधानीक पदावरील व्यक्ती व सत्तेतील आमदार असलेल्या नरहरी झिरवळ यांना जीव द्यावासा वाटतो. पुण्यासारख्या शहरात तरुणीवर सामुहिक बलात्काराची घटना घडते, हा प्रकार दुर्दैवी, वेदनादायी व अस्वस्थ करणारा आहे. अशा घटना घडत असताना सरकारला झोप तरी कशी लागते ? सरकारला केवळ मृतदेहच बघायचे आहेत का ? असे प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्रासाठी हा काळा दिवस आहे' अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी सरकारला धारेवर धरले.

शहरात घडलेल्या शालेय विद्यार्थीनींवरील अत्याचाराची घटना ताजी असतानाच बोपदेव घाटात सामुहिक बलात्काराचे प्रकरण शुक्रवारी उघडकीस आले. शहरातील या घटनांच्या पार्श्वभूमीवर सुळे यांनी शुक्रवारी माध्यमांशी संवाद साधला. सुळे म्हणाल्या, बोपदेव घाटात सामुहिक बलात्काराची घटना घडत असून कोणाला भितीच राहिलेली नाही. गृहमंत्र्यांना काही नैतिकता आहे की नाही. जिथे मोठे कंत्राट आहेत, तिथेच हे सरकार काम करते. इन्कमटॅक्स, ईडी



व सीबीआय ही यंत्रणा पक्ष फोडण्यासाठी सुरळीत चालते, मग महिला सुरक्षिततेवेळी ही यंत्रणा सुरळीत कशी चालत नाही. महिला सुरक्षितता, सामुहिक बलात्कार, झिरवळांचा आत्महत्येचा प्रयत्न, या घटनांमुळे आता सरकार घालवायची वेळ आली आहे. झिरवळ यांना जीव द्यावा वाटत असेल, तर सर्वसामान्य नागरीकांवर काय वेळ येत असेल. राज्याचे गृहमंत्रालय महिलांच्या सुरक्षिततेबाबत अपयशी ठरले आहे. त्यामुळे गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्विकारुन राजीनामा द्यावा.'

राज्याच्या आर्थिक स्थितीवर सुळे यांनी बोट ठेवले, त्या म्हणाल्या, राज्यात केवळ पक्ष, घरे फोडून नवीन क्रांती केली जात आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती खराब झाली आहे. नितीन गडकरी, राज ठाकरे यांच्यासह अनेक अर्थततज्ज्ञ त्याविषयी बोलले आहेत. राज्यावर दोन लाख कोटी रुपयांचे कर्ज वाढले आहे, महाराष्ट्र आर्थिक संकटात जाण्याच्या मार्गावर आहे, हे मी नव्हे तर त्यांचेच नेते म्हणत आहेत. राज्यात महिला सुरक्षित नाहीत, आर्थिक स्थिती सुरक्षित नाही. ऐन नवरात्रीतल खाद्यतेलाचे भाव वाढले आहेत. या सगळ्याला राज्य सरकारच जबाबदार आहे.' पक्षाच्या पदाधिकाऱ्यांबाबत सुळे म्हणाल्या, पक्ष खडतर परिस्थितीतुन जात असताना, संघर्षाच्या काळात अनेकजण पक्षासमवेत राहिले आहेत, त्यांचा पक्ष आयुष्यभर मानसन्मान ठेवेल. पक्षात येणाऱ्यांचाही मानसन्मान ठेवला जाईल. ही माझी नैतिक जबाबदारी आहे. बदलापुर घटनेतील आरोपीच्या एन्काऊंटरनंतर खुद्द गृहमंत्र्यांचेच हातात बंदुक घेतलेले पोस्टर्स सगळीकडे झळकले. गृहमंत्र्यांनी ही मिर्झापुर वेब सिरीज' नसून बदलापुरची घटना ही राज्यातील वास्तव आहे, हे विसरु नये. राज्यातील लेकींवरील अत्याचाराच्या घटना थांबत नाहीत, गृह विभागाचा गुन्हेगारांना धाक नाही. एफआयआर, फास्टट्रॅक कोर्ट वेळेवर का होत नाहीत ? बलात्कार करणाऱ्यांना चौकात फाशी का होत नाही ? हा देश केवळ अदृश्य शक्तीच्या मनमानीने चालला असून आम्ही ते होऊ देणार नसल्याचा इशारा सुळे यांनी दिला.

हर्षवर्धन पाटील व पवार कुटुंबाचे सहा दशकांपासूनचे नाते आहे. मागील दहा वर्षात ते वेगळ्या पक्षात काम करत असले तरी आमच्या नात्यात काही फरक पडला नाही. आमचा राजकीय संघर्ष होता, वैयक्तीक कधीच नव्हता. आता पुन्हा पाटील यांच्यासमवेत एकत्र काम करण्याची संधी मिळत आहे.लोकसभेपासून महाराष्ट्रात हवा बदलली आहे, अनेकजण आमच्याकडे येऊ लागले असल्याचेही सुळे यांनी सांगितले.

# पुणे जिल्ह्यातील ३१ बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी १३६ कोटींचा निधी मंजूर

**बारामती । प्रतिनिधी**

सन २०१९ ते २०२२ या चार वर्षांच्या काळात धरणाच्या पाणलोट क्षेत्रात व खालील बाजूस असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांचे अतिवृष्टीने मोठे नुकसान झाले. अनेक बंधा-यांचे भराव वाहून गेले, या पार्श्वभूमीवर क-हा, नीरा व इंद्रायणी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या ४३ पैकी ३१ बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी राज्य शासनाने १३६ कोटी ४२ लाख रुपयांच्या प्रस्तावांना मंजूरी दिली असून लवकरच याची कामे सुरु होणार आहेत.

यामध्ये कऱ्हा नदीवरील १९, नीरा नदीवरील ११ बंधा-यांचा यात समावेश आहे. दगडी बांधकामातील जीर्ण झालेल्या स्तंभाचा उर्ध्व भाग, उंबरठा पातळी, सांडवी भिंत या ठिकाणीचे बांधकाम काढून त्या ठिकाणी सलोह संधानकाचे बांधकाम करणे, कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांच्या अधो व उर्ध्व बाजूस भिंतीचे काम करणे, माती व भराव पिचिंगचे काम, संरक्षक भिंत, दगडी अस्तरीकरण, बर्गे काढणे व बसविण्यासाठी लोखंडी खाचा बसविणे, कोल्हापूर पध्दतीच्या पारंपरिक द्वारांऐवजी नव्याने तयार करण्यात आलेले द्वार यंत्रणेद्वारे संचलित करणे, ढापे सुरक्षितपणे साठवून ठेवण्यासाठी ढापे साठवून ठेवण्याच्या जागेभोवती कुंपण करणे अशी कामे यात करण्यात येणार आहेत.



### या बंधाऱ्यांचा आहे समावेश

बारामती तालुका - मेडद, नेपतवळण, क-हावागज, गुनवडी, फोंडवाडा, जळगाव कडेपठार, जळगाव सुपे, नीरावागज, सोनगाव, संगम, मुरुम, होळ, लाटे, कांबळेश्वर, कोऱ्हाळे खुर्द, शिरवली, अंजनगाव, बऱ्हाणपूर, फोंडवाडा जगताप वस्ती, काऱ्हाटी, काऱ्हाटी हायस्कूल, माळवाडी, आंबी जगताप वस्ती, आंबा माळवाडी, बाबुर्डी ढोपरेमळा, बाबुर्डी साळोबाडोह, मोरगाव, तरडोली, भोर तालुका- निघुटघर, आपटी, वडगाव, शिंद, भोर आरलॅब्ज